सोमवार, १३ मार्च २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक २३३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## काँग्रेसने देश लूटला –पंतप्रधान नरेंद्र मोदी



**बंगळुरू :** काँग्रेसच्या राजवटीत गरीबांना सुविधांसाठी सरकारकडे चकरा माराव्या लागत होत्या. गरीबांच्या विकासासाठी असलेला हजारो कोटींचा पैसा काँग्रेस सरकारने लुटला. याउलट गेल्या नऊ वर्षांत भाजप सरकारच्या विविध योजनांमुळे कोट्यवधी गरीबांचे जीवन सोपे झाले आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. १२) कर्नाटकमधील मांड्यात जाहीर सभेला संबोधित करताना काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. मांड्याला पोहचल्यानंतर पंतप्रधान मोदी यांचे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी स्वागत केले. या ठिकाणी पंतप्रधानांचा मोठा रोड शो झाला. या वेळी लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि त्यांनी पंतप्रधानांवर पुष्पवृष्टी केली. कर्नाटक दौऱ्यात पंतप्रधानांनी कोट्यवधी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले.

अंतरंग
पनवेल पोलीस ठाण्यात महिला सहाय्यता कक्ष/३
नवी मुंबईत सायक्लोथॉन; स्पर्धेतून पर्यावरणपूरक संदेश/६
वणव्यामुळे झाड जळून रस्त्यावर; वाहतूक कोंडी/७

### बांधकाम प्रकल्पामुळे बाधित मच्छीमारांसाठी सरकारचा निर्णय

# राज्यस्तरीय नुकसानभरपाई धोरण लागू

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाने धोरण निश्चित केले आहे. या धोरणास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून त्या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यामध्ये मच्छीमारांच्या नुकसानीसाठी सहा श्रेणी ठरविण्यात आल्या असून त्यानुसार मच्छीमारांना २५ हजार ते सहा लाखांपर्यंत नुकसानभरपाई मिळणार आहे. भरपाई देताना ती कुटूंब हा एक घटक विचारात घेऊन एकरकमी व एकदा देण्यात येईल, अशी माहिती मत्स्यविकासमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.



मच्छीमारांना देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाई रकमेच्या सहा श्रेणी निश्चित करण्यात आल्या असून मासेमारी क्षेत्र कायमचे नष्ट झाले असल्यास सहा लाख रुपये, प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रापासून ५०० मीटर त्रिज्येतील क्षेत्रामधील मासेमारीवर परिणाम झाल्यास चार लाख रुपये, हाताने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांचे झालेले नुकसान दोन लाख रुपये, दैनंदिन मासेमारीस निर्माण होणारी अडचण, मासेमारी क्षेत्रापर्यंत पोहचण्यास येणारा वाढीव खर्च इ. एक लाख रुपये, प्रकल्प बांधकामावेळी पाण्यामध्ये आलेली गढूळता यामुळे मासेमारीवर झालेला तात्पुरता प्रभाव ५० हजार रुपये तसेच बार्जेसमुळे मासेमारी नौका व जाळे यांचे नुकसान २५ हजार रुपये मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्यात येणार आहेत.

**या आहेत मुख्य बाबी**

प्रकल्पबाधित मच्छीमारांची ओळख, मासेमारी नौकेचा प्रकार आणि इतर माहिती तांत्रिक मुल्यमापन, सामाजिक प्रभाव मूल्यांकन अंमलबजावणी संस्था, यंत्रणाद्वारे बेस लाईन सर्वेक्षण आदर्श कार्यप्रणाली, मच्छीमारांना देण्यात येणारी नुकसानभरपाई, तक्रार निवारण यंत्रणा या बाबींचा धोरणात समावेश करण्यात आला आहे.



**पनवेल : शिक्षणासह विविध क्षेत्रांत अग्रेसर असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (स्वायत्त) महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त शनिवारी सलग दुसऱ्या दिवशी समारंभ झाला. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी कुलगुरू व राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. एस. एन. पठाण, मुंबई विद्यापीठाचे माजी प्र कुलगुरू नरेश चंद्रा, विजय जोशी यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आदी उपस्थित होते.** (वृत्त उद्याच्या अंकात)

# डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्रात दमदार विकास –प्रतिक कर्पे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस डबल इंजिन सरकारने महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टिकोनातून दमदार पावले उचलली आहेत. त्या अनुषंगाने देश व राज्यासाठी हे जनतेचे अर्थसंकल्प आहेत, अशी प्रतिक्रिया भाजप ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय सदस्य तथा मुंबई भाजपचे सचिव प्रतिक कर्पे यांनी रविवारी (दि. १२) पनवेल येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सबका साथ सबका विकास या तत्त्वाने सर्वसामान्यांना प्रगतीभिमुख वाटेवर नेण्याचे काम अधिक जोमाने सुरू आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत आगामी आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला. त्या अनुषंगाने पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेस तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस दीपक बेहेरे उपस्थित होते.

भाजप नेते प्रतिक कर्पे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना पुढे सांगितले की, अर्थसंकल्पात शेवटच्या व्यक्तीचा विचार करताना उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक कल्याणकारी योजनांची घोषणा केली. या अर्थसंकल्पात बऱ्याच योजना लक्षवेधी ठरल्या आहेत. जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या 'पिकवावे धन। ज्याची आस करी जन।। या तत्त्वास अनुसरून



### अर्थसंकल्पातून सक्षम विकासाचा वेग –आमदार प्रशांत ठाकूर

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ सालापासून देशात विकासाचा आलेख उंचावला आहे. त्यामुळे राजकारणाची परिभाषा बदलून देश प्रगतशील होत आहे. सबका साथ सबका विकास हे सूत्र कायम ठेवून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी काम केले जात आहे. त्या अनुषंगाने केंद्रात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी, तर राज्यात उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करीत देशाच्या आणि राज्याच्या सक्षम विकासाचा वेग मांडला आहे. त्यामुळे हे अर्थसंकल्प म्हणजे सर्वसामान्यांच्या विकासाचे पंचामृत आहे, असे भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

अर्थसंकल्प, असे म्हणत फडणवीस यांनी अर्थसंकल्प वाचनाला सुरुवात केली. ही बाब अत्यंत अभिमानास्पद अशी आहे. 'पंचामृता'च्या माध्यमातून मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात सर्वसामान्य घटकाचा प्राधान्याने विचार केल्याचे दिसतो. राज्याची अर्थव्यवस्था अधिक व्यापक करण्यावर यंदाच्या अर्थसंकल्पात भर दिल्याचे ठळकपणे जाणवते. **(पान २ वर..)**

## निवडक

### ज्येष्ठ नाट्य समीक्षक, लेखक कमलाकर नाडकर्णी यांचे निधन



**मुंबई :** ज्येष्ठ नाट्य समीक्षक आणि लेखक कमलाकर नाडकर्णी यांचे निधन झाले आहे. ८९ वर्षांचे नाडकर्णी मागील दोन ते तीन महिन्यांपासून आजारी होते. अखेर शनिवारी (दि. ११) रात्री ११च्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मागची ५० वर्षे ते नाट्य समीक्षा लिहित होते. त्यांनी आतापर्यंत शेकडो नाटकांची समीक्षा केली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असे कुटुंब आहे.

### भीषण कार अपघातात सहा जणांचा मृत्यू

**बुलढाणा :** समृद्धी महामार्गावर बुलढाण्यातील मेहकरजवळ रविवारी (दि. १२) सकाळी कार उलटून सहा प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये चार महिला, एक लहान मूल आणि चालकाचा समावेश आहे, तर सात प्रवासी गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# सशक्त भारतासाठी सशक्त भाजप काळाची गरज

### मंत्री रवींद्र चव्हाण यांचे प्रतिपादन; पेणमध्ये विकासकामांचे भूमिपूजन



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

जर तुम्हा आम्हाला सशक्त भारत बनवायचा असेल तर त्यासाठी येणाऱ्या काळात सशक्त भाजप बनविणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी पेण येथे केले.

पेणमध्ये नगर परिषदेच्या वतीने करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ११) झाले. त्यानंतर जाहीर सभा झाली. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, जि.प.च्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, अविनाश कोळी, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, माजी उपनगराध्यक्ष वैशाली कडू, माजी गटनेते अनिरुद्ध पाटील, महादेव दिवेकर, डी. बी. पाटील, प्रसाद भोईर, प्रांताधिकारी विठ्ठल इमानदार, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, मुख्याधिकारी जीवन पाटील, नगररचना अभियंता सुहास कांबळे, प्रशासन अधिकारी राजाराम नरुटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**

> **पेणमधील विकासकामांसाठी मी सातत्याने पाठपुरावा करीत असून शासनाकडूनही भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. निवडणुका जवळ आल्या की, विरोधकांच्या पेणमध्ये फेऱ्या वाढतात. ज्यांनी पेण शहरासाठी मागील काळात कोणत्याच प्रकारचा विकास निधी दिला नाही ते खासदार सुनील तटकरे आता आढावा बैठका घेऊन नागरिकांची दिशाभूल करीत आहेत.**
> **–रविशेठ पाटील, आमदार**




**अहमदाबाद : ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर–गावसकर चषक कसोटी मालिकेतील चौथ्या व निर्णायक सामन्यात भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने शानदार शतक ठोकले. त्याने १८६ धावांची खेळी केली. त्याचबरोबर अष्टपैलू अक्षर पटेलने अर्धशतक (७९ धावा) केले. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाच्या ४८० धावांना प्रत्युत्तर देताना ५७१ धावा केल्या असून भारताकडे आता ९१ धावांची आघाडी आहे.**


## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते तळोजा मजकूर येथे विकासकामांचा शुभारंभ



**तळोजा : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विकासाची अनेक कामे मार्गी लागत आहेत. त्यालाच अनुसरून तळोजा मजकूर गावात १०० मिलीमीटर व्यासाची नळजोडणी तसेच शिळ तलावात विहीर खोदण्यात येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १२) झाले.

पनवेल महापालिका हद्दीतील तळोजा मजकूर गावातील पाण्याची समस्या दूर करण्याच्या दृष्टिकोनातून सिडकोकडून १०० मिलीमीटर व्यासाची नळजोडणी तसेच महापालिकेच्या माध्यमातून २० लाख तीन हजार १७० रुपये खर्चून शिळ तलावात विहीर खोदण्यात येणार आहे. यासाठी माजी नगरसेवक हरेश केणी यांनी पाठपुरावा केला होता. या विकासकामांचा शुभारंभ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाला. **(पान २ वर..)**



## रायगड रोप वे पाच दिवस बंद

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगड येथील रोप वे सेवा तांत्रिक देखभालीसाठी १३ मार्चपासून पाच दिवस बंद राहणार असल्याचे रोप वे व्यवस्थापनाकडून कळविण्यात आले आहे.

किल्ले रायगडावर जाण्यासाठी आबालवृद्धांसाठी महत्त्वाची असलेली रायगड रोप वे सेवा तांत्रिक देखभाल व दुरुस्तीसाठी १३ ते १७ मार्चदरम्यान बंद राहणार आहे. या काळात गैरसोय होऊ नये म्हणून या संदर्भात रोप वे व्यवस्थापनाकडून निवेदन देण्यात आले आहे.

## पनवेलमधील चिंध्रण येथे साकारणार विहीर आणि बंधारा

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिंध्रण येथे भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून जल जीवन मिशन योजनेंतर्गत ९२ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून विहीर आणि बंधारा बांधण्यात येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी (दि. १२) झाले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जल जीवन मिशन योजना राबवली जात आहे. प्रत्येकाला पाणी मिळाले पाहिजे हा या योजनेचा उद्देश असून या अंतर्गत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून चिंध्रणसाठी ९२ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीमधून विहीर व बंधारा बांधण्यात येणार आहे.

भूमिपूजन समारंभास भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, चिंध्रण ग्रामपंचायतीचे सरपंच एकनाथ पाटील, उपसरपंच सुजीत पाटील, माजी सरपंच नरेश पाटील, शिवाजी दुर्गे, नरेश सोनावळे, जीवन पाडेकर, मनोज कुंभारकर, संतोष देशेकर, माजी सरपंच गणपत कडू, दिनेश पाडेकर, महादेव गडगे, एकनाथ मुंबईकर, नामदेव पाटील, हिरामण पाटील, मधुकर पाडेकर, तुषार दुर्गे, अरुण पाटील, अनंता कडू, चंद्रकांत देशेकर, अशोक साळुंके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.



# पालखी मार्गाचे काम डिसेंबरअखेर पूर्ण करणार

## ना. नितीन गडकरींची घोषणा



**पुणे : प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज या दोन्ही पालखी मार्गांचे काम जवळपास ७० टक्के पूर्ण झाले असून, काही ठिकाणी भूसंपादनाचा प्रश्न कायम आहे. हा प्रश्नही लवकर सुटून येत्या डिसेंबरअखेर दोन्ही पालखी मार्गांचे पूर्ण होऊन नवीन वर्षात त्यांचे उद्घाटन करण्यात येईल, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी केली. गडकरी यांनी या दोन्ही मार्गांच्या कामाची हवाई पाहणी केल्यानंतर ते पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. हवाई पाहणी वेळी माढ्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, 'संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग २३५ किलोमीटरचा असून त्याचे सहा टप्पे आहेत. यासाठी आठ हजार कोटींचा खर्च येणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण हे काम करत आहे. त्यातील पाच टप्प्यांचे काम सुरू झाले आहे. सहावा टप्पा हडपसर ते दिवे घाट असून, हा रस्ता महापालिकेच्या ताब्यात आहे. त्यासाठी महापालिका व राज्य सरकारशी चर्चा करून त्यातून मार्ग काढण्यात येईल. या टप्प्याच्या कामासाठी निविदा प्रसिद्ध झाली असून, भूसंपादनाचे काम लवकरच सुरू होणार आहे. मोहोळ ते वाखरी या टप्प्यासाठी दीड हजार कोटींचा खर्च येणार असून, हे काम ९१ टक्के पूर्ण झाले आहे. तर वाखरी ते खुडूस टप्प्याचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे. कुडूस ते धर्मपुरी हे १२०० कोटींचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. धर्मपुरी ते लोणंद हे काम केवळ ४८ टक्के तर लोणंद ते दिवे घाट हे १८०० कोटींचे काम २० टक्केच झाले आहे.'

तर संत तुकाराम महाराज पालखी मार्ग १३७ किलोमीटरचा असून, याचे काम तीन टप्प्यांत करण्यात येत आहे. यासाठी पाच हजार कोटींचा निधी देण्यात येणार आहे. यातील देहू ते हडपसर हा मार्ग दोन्ही महापालिकांच्या हद्दीतून जात आहे. हा शहरी मार्ग असल्याने तो सुधारण्याबाबत महापालिका व राज्य सरकारशी चर्चा करण्यात येईल, असे स्पष्ट करून हडपसर ते कासुर्डी हा राष्ट्रीय महामार्ग ६५ असून, हा मार्ग चारवरून सहा पदरी करण्याचे काम सुरू आहे. पालखी मार्गात पाटस ते बारामती, बारामती ते इंदापूर व इंदापूर ते तोंडले बोंडसे अशा तीन टप्प्यांचा समावेश आहे. त्यातील पाटस ते बारामती टप्प्याचे काम ८५ टक्के, बारामती ते इंदापूर ४४ तर इंदापूर ते तोंडले बोंडले टप्प्याचे काम ४१ टक्के पूर्ण झाले असून, येत्या तीन महिन्यांत या दोन्ही मार्गाचे बहुतांश काम पूर्ण होईल, असेही ते म्हणाले. या दोन्ही मार्गांवर सुमारे १९ हजार झाडे लावण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. त्याशिवाय कासुर्डी ते पाटस हा मार्गही चार पदरी करण्याचे काम सुरू आहे. मात्र, याचा पालखी मार्गात समावेश केलेला नाही.

### जीएसटीत सूट द्यावी

**पुण्यासाठी सुमारे ५३ हजार कोटींच्या रस्त्यांची कामे सुरू करण्यात आली असून त्यासाठी राज्य सरकारने स्टील व सिमेंटवरील जीएसटीत सूट द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच उजनी धरणातून वाळू उपशास परवानगी दिल्यास रस्त्यांच्या कामात त्याचा वापर करता येईल. यामुळे उजनीच्या खोलीकरणाचे कामही होईल, असे ते म्हणाले.**

# 'जल जीवन'मधील अनियमितता अधिकाऱ्यांच्या येणार अंगलट?

## कामांच्या तक्रारीची केंद्राकडून दखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेने तब्बल ९१३ कोटी ३८ लाख रुपयांच्या एक हजार ४०५ जल जीवनच्या योजनांमधील अनियमीततेचे प्रकरण जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांच्या अंगलट येण्याची चिन्हे आहेत. या संदर्भातील तक्रारीची दखल सरकारकडून घेण्यात आली आहे. तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल चार दिवसात शासनाला सादर करण्यात यावा असे आदेश शासनाने रायगड जिल्हा परिषदेला दिले आहेत. मात्र सुस्त असलेल्या जिल्हा परिषद प्रशासनाचे यामुळे धाबे दणाणले आहे.

शासनाचे कक्ष अधिकारी अ.बा.बुधे यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांना शासनामार्फत हे पत्र पाठवले आहे. त्या पत्राची प्रत तक्रारदार संजय सावंत यांना देण्यात आली आहे.

रायगड जिल्हा परिषदेने तब्बल ९१३ कोटी ३८ लाख रुपयांच्या १ हजार ४०५ जलजीवनच्या योजनांच्या ई-निविदा प्रक्रियेची माहिती कोणत्याही वर्तमान पत्रात प्रसिद्ध न करताच राबवण्यात आल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे केली होती. सावंत यांनी जलजीवन मिशनची निविदा प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केंद्रीय जलशक्ती मंत्री गजेंद्रसिंग शेखावत व केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग तथा जलशक्ती मंत्रालयाचे राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांना पत्र पाठवून केली होती. केंद्र शासनाकडून ही तक्रार राज्य सरकारकडे पाठविण्यात आली असून क्षेत्रीय कार्यालयाकडून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण होत नसल्याने तक्रारदार थेट केंद्र शासनाच्या पोर्टलवर तक्रार करीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

एकेका ठेकेदाराला ५० हुन अधिक म्हणजेच सुमारे १०० कोटींची कामे देण्यात आली आहेत, अशी तक्रार सावंत यांनी केली होती. याबाबत आणखी स्पष्टीकरण देताना सावंत यांनी मुळ ठेकेदारांनी प्रत्येक योजनमध्ये उप ठेकेदार नेमले असल्याचा गौप्यस्फोट केला आहे.

मुळ ठेकेदार योजनेमधील ३० ते ४० टक्के रक्कम कापून घेवून उपठेकेदार ६० ते ७० टक्के रक्कमेवर काम करीत असल्याचा धक्कादायक आरोप सावंत यांनी केला आहे. महत्वाचे म्हणजे सध्या जिल्हयात सर्वत्र लोकप्रतिनीधी जलजीवनच्या कामांची जी उद्घाटने करीत आहेत त्यामध्ये कामांचे कार्यारंभ आदेशही उप ठेकेदार यांनाच देण्यात आले आहेत असे सावंत यांचे म्हणणे आहे.

राजकीय नेत्यांना, लोकप्रतिनिधींना गावातील जलजीवन योजनेचा ठेकेदार हा उपठेकेदार असल्याचे माहिती असूनही काही राजकीय पक्षांचे प्रतिनिधी याबाबत अवाक्षर उच्चारत नसल्याबाबत सावंत यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

### सवाल उपस्थित

जलजीवन योजनेच्या नियमानुसार काम पूर्ण झाल्यावर एक वर्ष त्या योजनेची देखभार व दुरूस्ती ठेकेदारांवर असणार आहे. सब ठेकेदार नेमून या अटीचे पालन कसे करणार याबाबत सावंत यांनी प्रश्न उपस्थीत केले आहेत.

## निवडक

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** नवीन पनवेलकडे जाणाऱ्या ब्रिजच्या कामबंद बंद पडलेल्या इमारतीच्या समोर असलेल्या सर्व्हिस रोडवर उभी करून ठेवलेली दुचाकी मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. शैलेश बेंडखळे यांनी त्यांची २० हजार रुपये किमतीची यामाहा कंपनीची लाल व चंदेरी रंगाची तसेच समोरील काचेवर इंग्रजीमध्ये ओंकार असे लिहलेली गाडी (एमएच ०१ एके ८२६६) ही मोटरसायकल उभी ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ही गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### शिवजयंतीनिमित्त विविध उपक्रम

**पनवेल :** शिवसेना खांदा कॉलनी विभागाच्या मार्फत शिवजयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत साजरी करण्यात आली. या उपक्रमाला शिवसेना पनवेल विधानसभा जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. माजी नगरसेवक शिवाजीराव थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना खांदा कॉलनी विभागाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, झोपडपट्टीतील गरीब नागरिकांना धान्य, रेशनकार्ड, उत्पन्नाचे दाखले, विधवा महिलांच्या मुलांना शालेय वस्तू वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे शालेय आरटीई मुलांच्या शिक्षणाचे फॉर्म भरून देण्यात आली. या वेळी महादेव मुळीक, शंकरराव मुळीक, जगन्नाथ शिंदे, नामदेव मुळीक, श्रीयुत काळे, सुरेश पाटील यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# नैसर्गिक, गटशेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संपन्न करणार -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे : रामप्रहर वृत्त**

शेती लाभाची व्हावी यासाठी विषमुक्त नैसर्गिक शेती आणि गटशेतीशिवाय पर्याय नाही. गटशेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन यंत्र आणि नवे तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता निर्माण होत असल्यामुळे शेतकऱ्यांना संपन्न करण्यासाठी गटशेतीला प्रोत्साहन देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पानी फाऊंडेशनतर्फे शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२२'च्या पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला पानी फाऊंडेशनचे संस्थापक चित्रपट अभिनेते अमीर खान आणि किरण राव, पानी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, प्रमुख मार्गदर्शक डॉ.अविनाश पोळ आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वातावरण बदलामुळे शेतीसमोर मोठी आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत अवर्षण, अतिवृष्टीच्या फेऱ्यातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी शाश्वत शेतीला पर्याय नाही आणि त्यासाठी विषमुक्त, नैसर्गिक शेतीकडे जावे लागेल. उत्पादन खर्च कमी करून जमिनीचा पोत सुधारावा लागेल. या सर्व गोष्टी आपण नैसर्गिक शेतीद्वारे करू शकतो.रासायनिक खतामुळे जमिनीची रोग प्रतिकारक शक्ती कमी झाली आणि अधिक उत्पादन देण्याची शक्ती संपुष्टात आली. दुसरीकडे राज्यात कॅन्सरचा प्रादुर्भाव वाढला. म्हणून आपल्याला नैसर्गिक शेतीकडे यावे लागेल. महाराष्ट्रात विषमुक्त नैसर्गिक शेतीचे मिशन सुरू केले आहे. ३ हजार कोटी रुपये खर्च करून २५ लाख हेक्टर शेती नैसर्गिक पद्धतीकडे वळविण्यात येणार आहे. यामुळे शेतीची उत्पादकता वाढेल. शेतकऱ्यांना विम्याचा हप्ता भरण्याची आवश्यकता नाही. केवळ १ रुपये भरून त्यांना विम्याची नोंदणी करता येणार आहे.

### शेतकरी केंद्रबिंदू असलेला अर्थसंकल्प

***नुकत्याच मांडलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्याला केंद्रबिंदु ठेवून अनेक योजना सादर केल्या आहेत. जलयुक्त शिवार २.० तसेच गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजना सुरू केली आहे. अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेअंतर्गत केंद्राच्या पीएम किसान योजनेच्या ६ हजार रुपयांसोबत राज्य शासनही १ कोटी १२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ६ हजार रुपये टाकणार आहे.***

पान १ वरुन

# डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्रात दमदार विकास -प्रतिक कर्पे

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाचे हे ३५०वे वर्ष असून या महोत्सवासाठी ३५० कोटी रुपये देण्यात येणार आहेत. आंबेगाव (पुणे) येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यानासाठी ५० कोटी देण्यात आले आहेत. मुंबई, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथे शिवचरित्रावरील उद्याने उभारली जाणार आहेत, तर शिवनेरी किल्ल्यावर शिवछत्रपतींच्या जीवनचरित्रावर संग्रहालय उभारण्यात येणार असून शिवकालीन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी ३०० कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचा सन्मान होण्यासाठी या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी अधिक तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांसाठी आता केवळ एक रुपयात पीकविमा दिला जाणार आहे. याचबरोबर नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यासाठी तीन वर्षांत २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रीय शेतीखाली आणले जाणार आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनांचे लाभ दिले जातील. २०१७च्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील उर्वरित पात्र शेतकऱ्यांना योजनेचे लाभ दिले जातील, तर महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनाही शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. महाकृषिविकास अभियान तसेच कोकणासाठी काजू बोर्ड बनवले जाणार आहे. याबरोबरच नैसर्गिक शेतीला प्राधान्य दिले गेले आहे. मागेल त्याला शेततळे या योजनेसाठी एक हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहे तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबवली जाईल. शेतकऱ्यांसाठी ट्रान्सफॉर्मर योजना उपयुक्त ठरेल. एकूणच शेतकऱ्यांना थेट रोखीने आर्थिक मदत देण्यावर भर देण्यात आला आहे.

मुंबईचा सर्वांगीण विकास या न्यायाने अर्थसंकल्पात मुंबईच्या सुशोभीकरणासाठी एक हजार ७२९ कोटी रुपये तरतूद केली गेली आहे. एमएमआर क्षेत्रात पारसिक हिल्स बोगदा, मीरा-भाईंदर पाणीपुरवठा, मुंबई पारबंदर प्रकल्प, विविध उड्डाणपूल या वर्षी पूर्ण केले जातील. ठाणे-वसई खाडी जलवाहतुकीने जोडले जाणार आहे. गेट वे ऑफ इंडियाजवळ रेडिओ क्लबनजीक प्रवासी जेट्टी, इतर सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. पुणे मेट्रोसाठी आठ हजार ३१३ कोटींची कामे प्रगतिपथावर आहेत, तर मुंबईत ३३७ किमी मेट्रोचे जाळे निर्माण केले जाईल. मुंबई मेट्रो १०, ११, १२ असे नवीन प्रकल्प उभारले जातील. यातून सर्वसामान्य मुंबईकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता होणार आहे.

अर्थसंकल्पात महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' योजना आता नव्या स्वरूपात येत आहे. पिवळ्या आणि केशरी रेशनकार्डधारक कुटुंबांतील मुलींना याचा लाभ मिळेल. जन्मानंतर मुलीला पाच हजार रुपये तसेच इयत्ता पहिलीत चार हजार, सहावीत सहा हजार, अकरावीत आठ हजार आणि मुलगी १८ वर्षांची झाल्यावर ७५ हजार रुपये अशी तरतूद करण्यात आली आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या बस तिकिटदरात महिलांना ५० टक्के सवलत देण्यात आली. महिला बचत गटांच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यात बांबू क्लस्टर, कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापुरी चप्पल क्लस्टर, मुंबईत महिला युनिटी मॉलची स्थापना होईल. माता सुरक्षित तर घर सुरक्षित या अभियानात चार कोटी महिला-मुलींची आरोग्य तपासणी, औषधोपचार केले जातील. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविकांच्या मानधनात भरीव वाढ केली गेली आहे. नोकरदार महिलांसाठी ५० वसतिगृहे आणि अडचणीतील महिलांसाठी, लैंगिक शोषणापासून मुक्त केलेल्या महिलांसाठी, कौटुंबिक समस्याग्रस्त महिलांसाठी स्वाधार आणि उज्वला या दोन योजनांचे एकत्रिकरण करून केंद्राच्या मदतीने शक्तीसदन ही नवीन योजना आणण्यात आली आहे.

आरोग्याची विशेष काळजी घेण्यासाठी अर्थसंकल्पात सर्वसामान्यांच्या आरोग्यावर खर्चासाठी अधिक तरतूद करण्यात आली आहे. महात्मा ज्योतिराव फुले जनारोग्य योजनेत विमा संरक्षण १.५० लाखांहून पाच लाख रुपये केले आहे. त्यामुळे आता पाच लाख रुपयांपर्यंत उपचार घेता येणार आहेत. नवीन २०० रुग्णालयांचा यात समावेश होईल. मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियांचे लाभ २.५०लाखांहून चार लाखांपर्यंत केले जातील तसेच राज्यभरात ७०० स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात येणार आहेत.

अर्थसंकल्पात रस्ते प्रकल्पाच्या आधुनिकतेवर भर दिला गेला आहे. पुणे रिंगरोड, मुंबई-पुणे मिसिंग लिंक, विरार-अलिबाग मार्ग, रायगड जिल्ह्यातील रेवस ते रेड्डी, सिंधुदुर्ग सागरी महामार्गासाठी निधी देण्यात आला आहे. हायब्रीड ॲन्युईटीतून सात हजार ५०० किमीचे रस्ते त्यासाठी ९० हजार कोटी रुपये, तर आशियाई बँक प्रकल्पातून ४६८ किमीचे रस्ते उभारले जातील. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून ६५ हजार किमीचे रस्ते तयार केले जाणार आहेत. रेल्वे प्रकल्प, बसस्थानक आधुनिकीकरण आणि विमानतळ विकास करण्यावर भर देताना नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वेला निधी दिला आहे. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव ब्रॉडगेजसाठी ४५२ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. १०० बसस्थानकांचे आधुनिकीकरण आणि पुनर्बांधणीसाठी सुमारे ४०० कोटींचा निधी दिला जाणार आहे. शिर्डी विमानतळावर नवे प्रवासी टर्मिनल उभारले जाणार असून नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तारही केला जाणार आहे. पुरंदर येथे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नागपुरातील मिहान प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये देण्यात आले आहेत.

युवकांच्या हाताला रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार नव नव्या योजना आखत आहे. रोजगारासाठी गावागावातून होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराचा आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्यातील ५०० ग्रामपंचायतींमधून कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहे तसेच कौशल्य वर्धानाद्वारे युवकांना रोजगारक्षम बनवण्यासाठी पुढील तीन वर्षांत दोन हजार ३०७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ५०० औद्योगिक संस्थांचा दर्जाही वाढविण्यात येणार आहे. ७५ संस्थांचे आधुनिकीकरण करून त्याद्वारे युवकांना रोजगाराचे धडे देण्यात येणार आहेत. या योजनांसाठी ६१० कोटींचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

विद्यार्थी विकासाकडेही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यानुसार विद्यार्थांना आता भरीव शिष्यवृत्ती मिळणार आहे. शिक्षणसेवकांच्या माधनात मोठी वाढ केली आहे. शैक्षणिक संस्थांसाठी ५०० कोटी रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे, तर खेळांना प्रोत्साहनासाठी विविध योजना मांडल्या आहेत. खेळाडूंची कामगिरी उंचावण्यासाठी मिशन लक्षवेध, बालेवाडी पुणे येथे स्पोर्टस सायन्स सेंटर उभारण्यात येणार आहे. पुण्यानंतर आता छत्रपती संभाजीनगर येथे नवीन क्रीडा विद्यापीठ होणार आहे.

भाषा अन् संस्कृतीसाठी मोठी घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली असून अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथे मराठी भाषेचे विद्यापीठ करण्याची घोषणा अर्थमंत्री फडणवीस यांनी केली. यासह अनेक ठिकाणी नाट्यगृह, चित्रनगरींसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी मराठी भाषा युवक मंडळे सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व नाट्यगृहांच्या दुरुस्तीसाठी ५० कोटी रुपये, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव, कोल्हापूर चित्रनगरी येथे आंतरराष्ट्रीय सुविधांसाठी ११५ कोटी रुपयांची तरतूद आहे. कला प्रकार जतनासाठी महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळाचीही स्थापना करण्यात येणार आहे.

पर्यटनाला चालना देण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील ५०० युवकांना जल, कृषी, कॅराव्हॅन, साहसी पर्यटन तसेच आदरातिथ्य क्षेत्राचे प्रशिक्षण दिले जाईल. पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाचा नागपूर फुटाळा तलावाच्या धर्तीवर विकास केला जाणार आहे. १० पर्यटन स्थळांवर टेंट सिटी उभारणार आहे. राज्याचा वार्षिक महोत्सव आराखडा तयार असून यात शिवजन्मोत्सव शिवनेरी, भगवान बिरसा मुंडा महोत्सव, जव्हार, वीर बाल दिवस महोत्सव नांदेड इत्यादींचा समावेश आहे. त्यामुळे यंदाच्या राज्याच्या अर्थसंकल्पात निश्चित जनतेच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब दिसते.

या अर्थसंकल्पातील सर्वच बाबी 'सर्वजनहिताय' अधोरेखित करणाऱ्या आहेत. एकूणच राज्याचा हा नुसता अर्थसंकल्प नाही, तर महाअर्थसंकल्प ठरणारा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कुठलेही आकडे न फुगवता मागील वर्षांची तरतूद पाच लाख २८ हजार कोटी असताना एवढ्या मिशन स्वरूपात योजना पाच लाख ४७ हजार ४५० कोटींमध्ये बसवून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या ३० वर्षांच्या तळागाळातील अनुभवाची एक प्रचिती या अर्थसंकल्पातून दिली आहे, असेही प्रतिक कर्पे यांनी या वेळी नमूद केले.

## सशक्त भारतासाठी सशक्त भाजप काळाची गरज

मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वामध्ये देशाला दिशा देण्याचे काम होत असून देश महासत्तेकडे जाताना तुम्ही आम्ही सर्वजण पाहत आहोत. कोरोनाच्या संकटकाळात जवळजवळ ८० कोटी जनतेला गरीब कल्याण योजनेच्या माध्यमातून मोफत धान्य देण्याचे काम केले गेले. जी-२० परिषदेत आज आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नेतृत्व करणे अभिमानास्पद आहे. हे सर्व विरोधकांनी डोळे उघडून पाहिले पाहिजे. आपल्या शेजारी असणारे देश पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका यांची या दोन-अडीच वर्षांमध्ये काय अवस्था झाली आहे, तिथे कशा पद्धतीचे वातावरण निर्माण झाले आहे, तिथे असणारे नागरिक हे कसे जीवन व्यतीत करीत आहेत आणि इकडे आपला देश सुजलाम् सुफलाम् होत आहे हे आपल्या देशाला लाभलेल्या खंबीर नेतृत्वामुळे शक्य होत आहे.

पुढे बोलताना चव्हाण यांनी सांगितले की, पेण तालुक्यातील खारेपाट भागातील पाणी समस्या निवारणासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना एमएमआरडीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी दिला. आता केंद्र सरकारच्या माध्यमातून जलजीवन मिशन योजना राबविण्यात येत आहे. पेण शहराचा विकास झपाट्याने होत असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात विकासनिधी या सात महिन्यांत देण्यात आला.

मागील अडीच वर्षांत महाविकास आघाडी सरकारने कशा प्रकारे लोकांची दिशाभूल करण्याचे काम केले हे आपण सर्वजण जाणतो तसेच २०१४च्या अगोदर आघाडी सरकार महाराष्ट्राला कसे अधोगतीला घेऊन गेले होते याचे एक उदाहरण म्हणजे जवळजवळ १० ते १२ तास वीज भारनियमन आपल्या राज्यात सुरू होते, परंतु २०१४नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या वेळच्या काळात केलेल्या कामांमुळे आणि नियोजनामुळे नंतरच्या काळातही २४ तास प्रत्येक घरात वीज आहे. सबका साथ सबका विकास या तत्त्वावर आपले हे सरकार चालले असून यापुढेही पेण शहरासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे आश्वासन या वेळी मंत्री चव्हाण यांनी दिले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, आमदार रविशेठ पाटील यांनी पेण मतदारसंघाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी पावले उचलली असून आता माजी आमदार धैर्यशिल पाटील सोबत आले आहेत. हे आपल्या सर्वांच्या पुढच्या पिढीसाठी एक अमृतदायक अशा पद्धतीचे शुभचिन्ह ठरणार आहे, असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रत्येक कृतीमध्ये सबका साथ सबका विकास हे सूत्र आपल्याला पाहायला मिळते. त्याच पद्धतीने राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आलेले हे सरकार सबका विकास राज्य सरकारचा प्रयास जोडून संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठी जोमाने कामाला लागले आहे. आता विकासाचा प्रवास सुरू झाला असून हा प्रवास आम्हा सगळ्या रायगड जिल्ह्याच्या लोकांना आनंद देणारा ठरणार आहे.

माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी गेल्या नऊ वर्षांत आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या माध्यमातून काम करीत असताना पेणचा चेहरामोहरा बदलण्याचे काम आम्ही केले असून यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विकासकामांच्या बाबतीत पेणला नेहमी झुकते माप देणारे आमचे नेते रवींद्र चव्हाण साहेब यांचे नेहमी पाठबळ लाभले आहे, असे आवर्जून सांगितले. यापुढेदेखील पेणचा विकास होत राहील, असे अभिवचनही त्यांनी दिले.

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते तळोजा मजकूर येथे विकासकामांचा शुभारंभ

या कार्यक्रमास माजी नगरसेवक हरेश केणी, रवि म्हात्रे, नंदकुमार म्हात्रे, राजेश महादे, संतोष पाटील, बबन पाटील, सुनील पाटील, भरत पाटील, दीपक पाटील, अशोक पाटील, बाळाराम पाटील, संतोष पाटील, संदीप पाटील, गणेश पाटील, निर्दोष पाटील, गुरू मुंबईकर, सचिन पाटील, कैलाश पाटील, मदन पाटील, वैभव पाटील, वंदना पाटील, युवा कार्यकर्ते प्रतिक पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेल पोलीस ठाण्यात महिला सहाय्यता कक्ष

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या संकल्पनेतून पनवेल शहर पोलीस ठाण्यातसुद्धा महिला सहाय्यता कक्ष उभारण्यात आले असून या ठिकाणी तक्रारदार पीडित महिलांनी निसंकोचपणे तक्रार देण्यास यावे, असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांनी केले. ते पोलीस ठाण्यात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला दक्षता समितीच्या बैठकीत बोलत होते.



## निसंकोचपणे तक्रार देण्याचे आवाहन

महिलांना शहर सुरक्षित वाटेल, असे वातावरण निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या समस्या समजून घेणे, त्यावर कायदेशीर कारवाई करून न्याय देणे या उद्देशाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला सहायता कक्ष सुरू करण्यात येत असल्याची माहितीही कादबाने यांनी या वेळी दिली.

या बैठकीला महिला साहाय्यक पोलीस निरीक्षक मोनिका चौधरी, गोपनीय विभागाचे संजय धारेराव, किरण सोनावणे यांच्यासह महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच महिला दक्षता समितीच्या महिला उपस्थित होत्या. या वेळी उपस्थिती महिलांना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थित समितीच्या सदस्यांनी आपल्या अडी अडचणी बैठकीत मांडल्या.

या वेळी मार्गदर्शन करताना कादबाने यांनी सांगितले की, सहाय्यता कक्षामध्ये एक महिला अधिकारी आणि तीन कर्मचारी तैनात राहतील. महिला आणि मुलींच्या संबंधातील सर्व प्रकारच्या तक्रारी सहाय्यता कक्षातील महिला अधिकारी कर्मचाऱ्यांकडून हाताळल्या जाणार आहेत.

अनेकदा पीडित महिला या पुरुष पोलीस अधिकाऱ्यांसमोर लैंगिक छळ, बलात्कारासारख्या घटनांची माहिती देताना संकोच करतात, मात्र हा कक्ष सुरू झाल्यानंतर त्यांना निसंकोच तक्रार करता येणार आहे. या तक्रारी स्वीकारण्यासाठी चोवीस तास महिला अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या संदर्भात दक्षता समितीच्या सदस्यांनी समाजामध्ये जनजागृती करावी असे आवाहन त्यांनी केले.

# बी. टी. कांबळे गुरुजींचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारकोपर गावचे ग्रामस्थ बी. टी. कांबळे गुरुजी यांचा ७५ वा अमृत महोत्सवी वाढदिवस त्यांचे बालमित्र माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि. १०) उलवे नोड सेक्टर १६ येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झाला.




या वेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी कामगार नेते महेंद्र घरत, भाऊ पाटील, जयंत भगत, अजय भगत, प्रकाश भगत, त्यांचे सोयरे अनंता ठाकूर, भानुदास ठाकूर त्यांची मुले, नातवंडे, जावई, खारकोपर, शेलघर, गव्हाण, शिवाजी नगर, न्हावे असे पंचक्रोशीतील मित्र मंडळी, नातेवाईक, सगेसोयरे मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कांबळे गुरुजींबरोबर घालवलेल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला व गुरुजींना पुढील आरोग्यदायी, दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

वाय. टी. देशमुख यांनीदेखील कांबळे गुरुजींबरोबर घालविलेले शालेय जीवनातील काहीप्रसंग आपल्या भाषणातून विशद केले. कांबळे गुरुजी यांच्या अमृत महोत्सव वाढदिवसानिमित महेंद्र घरत, तानाजी देशमुख, हिरामण जोशी, अशोक गायकवाड, नितीन ठाकूर आदींनी आपल्या भाषणातून शुभेच्छा दिल्या.

या समारंभात त्यांची मुलगी ज्योत्स्ना सुधीर ठाकूर आणि जावई सुधीर ठाकूर यांनीदेखील मनोगत व्यक्त केले. शेवटी कांबळे गुरुजींनी आपल्या मनोगतांमध्ये सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन राजकिरण कोळी यांनी केले तर या कार्यक्रमासाठी लागणारी सजावटीची नाविण्यपूर्ण कल्पना रयत शिक्षण संस्थेचे कला शिक्षक मंगेश खुटारकर यांनी साकारली.

# रिक्षाचालकाची प्रवाशाला मारहाण

**पनवेल :** रिक्षा भाड्याचे देवाणघेवाणीवरून अनोळखी रिक्षाचालकाने शिवीगाळ करून प्रवाशाला मारहाण करून त्याच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरीने खेचून निघून गेल्याची घटना पनवेलजवळील उसर्ली खुर्द येथे घडली आहे. शशिकांत शेळके (वय ५०) पनवेल रेल्वे स्टेशन येथून रिक्षा करून ती घेऊन उसर्ली खुर्द येथे चालले होते. या वेळी त्यांची रिक्षा चालकाबरोबर भाड्याच्या देवाण घेणावी वरून बोलाचाली झाली. तेव्हा रिक्षाचालकाने शेळके यांना शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन (किंमत जवळपास २२ हजार रुपये)जबरीने खेचून घेऊन निघून गेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खारघर येथे शिवसेनेचे जनसंपर्क कार्यालय सुरू

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथे शिवसेनेचे जनसंपर्क कार्यालय सुरू झाले आहे. या कार्यालयाचे शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी नवनिर्वाचित शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

खारघरमधील जनतेचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीकोनातून शिवसेनेचे महानगर संघटक मंगेश रानवडे आणि खारघर शहर संघटक कळंबोली इम्तियाज शेख यांनी शिवसेना जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे.

या कार्यालयामुळे खारघर शहरातील सर्वसामान्य जनतेच्या सर्व अडी अडचणी सोडवण्यात मदत होणार आहे. या वेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख परेश पाटील, महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, खोपोली विभाग संपर्क प्रमुख विजय पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी आदी उपस्थित होते.



# जांभिवलीतील आदिवासी वाड्यांचा पाणीप्रश्न मिटणार

## जल जीवन मिशन योजनेचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जांभिवली ग्रामपंचायतीतील घेरे किल्ला या या आदिवासी वाडीला जल जीवन मिशन अंतर्गत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रेरणेने तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने आणि आमदार महेश बालदी यांच्या सखोल प्रयत्नाने पाण्याचा प्रश्न संपणार आहे. या योजनेसाठी २७ लाख निधी मंजूर झाला असून नुकतेच या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी सरपंच रिया कोंडिलकर, पनवेल तालुका उपाध्यक्ष ॲड. संजय टेंबे, माजी सरपंच शिवाजी माळी, आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे, रवींद्र कोंडीलकर, मनुहर कोंडीलकर, भरत कोंडीलकर, कालूराम माळी, कल्पेश कोंडीलकर, मयुरेश कोंडीलकर, घेरेवाडीतील ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# नवीन पनवेलमध्ये ब्राह्मण सभेतर्फे महिलांसाठी मनोरंजनपर खेळ

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेच्या वतीने महिला दिन साजरा करण्यात आला. नवीन पनवेल येथील सिडको उद्यानातील ॲम्पी थिएटरमध्ये हा कार्यक्रम झाला.



यानिमित्ताने खेळात रंगल्या गृहिणी हा मनोरंजनपर खेळांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विजेत्या महिलांना आकर्षक पैठण्या पारितोषिक म्हणून देण्यात आल्या. याचबरोबर 'लकी ड्रॉ' काढण्यात आले. या स्पर्धेत मानसी पाटणकर यांनी प्रथम, कीर्ती महाजन यांनी द्रितीय, वैशाली केतकर यांनी तृतीय, मनिषा कुलकर्णी यांनी चतुर्थ व मेधा मैलुरकर यांनी पाचव्या क्रमांकाची पैठणी प्राप्त केली. श्रीनिवास काजरेकर यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन केले.

प्रसाद जोशी यांनी पंच म्हणून काम पाहिले. संस्थेच्या अध्यक्ष दीपाली जोशी, सचिव मंजुषा भावे, खजिनदार वैशाली सरदेशपांडे, सहखजिनदार आरती बोधनकर व सदस्या विनया वाळिंबे, मानसी जोशी यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.

> **ब्राह्मण सभेच्या वतीने प्रतिवर्षी महिला दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने नोकरी, व्यवसाय व संसार यामध्ये गुंतलेल्या महिलांना आनंदाचे व विरंगुळ्याचे काही क्षण प्राप्त करून देण्याचा प्रयत्न आमची संस्था करते.**
>
> **–दिपाली जोशी, अध्यक्ष, ब्राह्मण सभा, नवीन पनवेल**

# सोनारीत महिलांसाठी आरोग्य शिबिर

**उरण : बातमीदार**

महिलांच्या विविध समस्या व महिलांना होणारे विविध आजार लक्षात घेउन स्त्रियांच्या आजार व रोगावर उपाय योजना करण्याच्या दृष्टीकोनातून सोनारी ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष राकेश कडू यांच्या माध्यमातून सोनारी गावातील जिल्हा परिषद मराठी शाळा येथे शनिवारी (दि. ११) महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे उद्घाटन सोनारीच्या सरपंच पूनम कडू यांनी फीत कापून केले. या वेळी डॉ. कृष्णा बोरकर यांनी महिलांची मासिक पाळी या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी थोईरॉईड, कोलेस्ट्रॉल, शुगर,सीबीसी, हिमोग्लोबिनची मोफत तपासणी करण्यात आली. स्त्रियांना मोफत सल्ला देऊन स्त्रियांची तपासणी करुन स्त्रियांना मोफत गोळ्या औषधे देण्यात आले.

या वेळी डॉ. कृष्णा बोरकर, डॉ. मीना बोरकर, डॉ. आरती म्हात्रे, डॉ. हरिओम म्हात्रे, डॉ. नम्रता कडू, डॉ. दिव्या कडू, ग्रामसुधारणा मंडळ सोनारीचे अध्यक्ष राकेश कडू, उपाध्यक्ष रवींद्र तांडेल, खजिनदार धर्मेंद्र कडू, सेक्रेटरी साहिल कडू आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार चेतन पाटील यांनी केले.

स्त्रियांनी या आरोग्य शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला असे सांगत सरपंच पूनम कडू यांनी तसेच महिला ग्रामस्थांनी राकेश कडू यांचे आभार मानले.

# स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेतर्फे विविध क्षेत्रातील महिलांचा सत्कार

**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवीन पनवेलच्या स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेने सामाजिक, राजकीय, वकील, डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस अधिकारी, शिक्षिका व गायिका यांचा वर्षा ठाकूर यांचे हस्ते गौरव केला.



नवीन पनवेल सेक्टर १६ मधील स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेने जागतिक महिला दिनी आगळ्या वेगळ्या कल्पनेने व विविध क्षेत्रातील महिलांचा एकाच मंचावर सत्कार केला. यामध्ये सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नाप्रभा घरत, वकील प्रीतीताई मनोज भुजबळ, इन्स्पेक्टर वैशाली गलांडे, डॉ. प्रियांका तेजस कांडपिळे, वकील व गायक सुरेखा भुजबळ, इंजिनिअर स्वराली कांडपीळे, शिक्षिका स्वप्ना अत्रे, ज्येष्ठ महिला गुलाब थवई तसेच शकुंतला अत्रे यांचा सत्कार वर्षा प्रशांत ठाकूर यांचे हस्ते सुरुची हॉलमध्ये करण्यात आला.

या वेळी वर्षाताईंनी एकाच मंचावर विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सत्कार केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. या वेळी संगीत, डान्स, कविता वाचन, सोलो डान्स व फॅशन शो अशा विविध कला गुणांचे सादरीकरणसुध्दा मैत्रिणींनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नीता घाटूगडे, सुलभा मोरे, संध्या भुजबळ व स्वाती गरुड यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाला सर्व सभासद मैत्रिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



पनवेल : भाजप उलवे नोड चिटणीस नामदेव ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भक्ती ठाकूर व नंदिती ठाकूर उपस्थित होत्या.



पनवेल : आकुर्ली येथील भाजप युवा नेते जगदिश शेळके यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील व अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : मुंबई अणुव्रत समितीच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. त्या अंतर्गत समितीच्या रायगड क्षेत्राच्या वतीने शहरातील कल्पतरू येथील राजीव गांधी पार्कमध्ये पाच डस्टबिन देण्यात आले आहे. या डस्टबिनच्या वाटपावेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, राजेश मेहता, सोहित आठवणे, चत्तरलाल मेहता आदी उपस्थित होते. (छाया : विकास म्हात्रे)





पनवेल : भाताण येथील श्री दत्तगुरू मंदिर जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा सोहळा शुक्रवारी झाला. या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आमदार महेंद्र दळवी यांच्याकडून देणगी स्वरुपात अडीच लाख रुपये देण्यात आले. त्याबद्दल भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोईर यांनी आमदार महेंद्र दळवी व शिवसेना तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे यांची भेट घेऊन आभार मानले.



पनवेल : महापालिका क्षेत्रात कार्यरत असलेले रायगड सुरक्षारक्षक दीपक बाळकृष्ण कदम (रा. आपटा) यांनी महात्मा गांधी उद्यानालगत असलेल्या (देवाळे तलाव) मोहल्ला येथील लहान मुलाचा जीव वाचवला. त्याबद्दल जय महाराष्ट्र मित्र मंडळ आपटा आयोजित स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभावेळी माजी पं. स. सदस्य तनुजा संजय टेंबे आणि मंडळाचे पदाधिकारी यांच्या हस्ते कदम यांचा सत्कार करण्यात आला.



पनवेल : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या मुख्यालयात रविवारी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी आस्थापना विभागाचे दीपक शिलकन, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक दशरथ भंडारी, प्रितेश चौधरी व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय

# भाजपचे 'मिशन २०२४'

मिशन २०२४च्या निवडणुकांची जोरदार तयारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत. यासाठी मोदी यांनी जनतेच्या विकासकामांचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक राज्य आणि प्रदेशाचा दौरा सुरू केला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोदींनी ही मोर्चेबांधणी करण्याचा सपाटा सुरू केला आहे. विरोधकांच्या टीका टिप्पणींकडे दुर्लक्ष करत विजयी वाटचालीकडे लागले आहेत.

**भाजपच्या मिशन २०२४ ची ब्ल्यू प्रिंट तयार झाली असून या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी १०० सभा घेणार आहेत. मेघालय, त्रिपुरा, आणि नागालँड या तीन ईशान्येकडील राज्यांमध्ये भाजपने आपले सरकार स्थापन केले. यानंतर, आता भाजपने मिशन २०२४ साठी कंबर कसली आहे. भाजपच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाने लोकसभा निवडणुकीत बम्पर विजय मिळविण्यासाठी ब्लू प्रिंटदेखील तयार केली आहे. आता भाजपने पश्चिम बंगाल, ओडिशा आणि दक्षिण भारतातील राज्यांवर लक्ष केंद्रीत केले आहे. भाजप याच वर्षापासून २०२४ साठी संपूर्ण ताकद झोकून कामाला लागणार आहे. पक्षाचा सर्वात मोठा चेहरा असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी या वर्षाच्या अखेरपर्यंत किमान १०० सभा घेणार आहेत. यात प. बंगाल, ओडिशा आणि दक्षिणेकडील राज्यांमधील मोठ्या प्रकल्पांच्या घोषणा, महिला आणि अल्पसंख्यकांपर्यंत पोहचणे आदींचा समावेश आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने ओडिशा, पश्चिम बंगाल आणि दक्षिण भारतातील १६० मतदारसंघांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे भाजपचे लक्ष्य आहे. भाजपने २०२४ मध्ये बम्पर विजयासाठी तीन ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. यात दक्षिण भारतीय राज्ये, ओडिशा आणि पश्चिम बंगालचा समावेश आहे. या राज्यांत पीएम मोदी याच वर्षाच्या अखेरपर्यंत किमान १०० सभा करतील. या दरम्यान ते या राज्यांमध्ये मोठ्या प्रकल्पांची घोषणा करू शकतात. याशिवाय, महिला आणि अल्पसंख्यकांवरही विशेष लक्ष असेल. महिला मोर्चाला महिलांपर्यंत पोहचण्यावर विशेष लक्ष देण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, अल्पसंख्याक मोर्चालाही १० राज्ये आणि एका केंद्र शासित प्रदेशात जमिनिवर उतरून काम करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. मोर्चाचा फोकस ६० लोकसभा मतदारसंघांवर राहील. २०२४ साठी तामिळनाडू, आंध्रप्रदेश आणि केरळवर भाजपचे विशेष लक्ष असेल. याच वर्षात कर्नाटक विधानसभा निवडणूक होत आहे. या निवडणुकीत भाजप विजयासंदर्भात आश्वस्त आहे. तसेच, पश्चिम बंगाल आणि ओडिशा राज्यांत पक्ष एका खास रणनितीवर काम करेल, असे भाजपच्या गोटातून खात्रीलायक वृत्त आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री फडणवीसही या मोहीमेत मागे राहीले नाहीत त्यांनीही भाजपच्या मिशनसाठी १० खंदे शिलेदार निवडले आहेत. राज्यात ४५ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यासाठी १६ जागांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. नव्या मिशननुसार प्लॅनिंग झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ज्या जागा जिंकल्या आहेत त्यावर आमचे लक्ष आहेच, मात्र ज्या जागा जिंकायच्या आहेत, त्यावर आम्ही अधिक लक्ष देणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. लोकसभा निवडणूक २०२४ची तयारी आणि रणनिती ठरविण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक झाली. बैठकीला विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे उपस्थित होते. या वेळी बारामती, मावळ, सोलापूर, कोल्हापूर, सातारा मतदारसंघात जोर लावण्याच्या सूचनाही फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**

# रिक्षा, हातगाडीवाल्यांना शिस्त लावणे गरजेचे



**खबरबात**
विजय मांडे

कर्जत शहरात वाहतूक कोंडी होण्याचे कारण म्हणजे कुठेही उभ्या करण्यात येणाऱ्या रिक्षा आणि बाजारपेठेतील दुतर्फा असलेले हातगाडीवाले आणि फेरीवाले. या सर्वांच्यामुळे कर्जतच्या बाजारपेठेतच नव्हे तर शहरातून चालणे कठीण होत आहे. त्यांना कुणीतरी आवरा असा सूर कर्जतकरांकडून ऐकायला मिळतो, परंतु अनेकजण याबाबतीत पाठपुरावा करतात त्याला यश येत नाही त्याचे कारण संबंधीत अधिकाऱ्यांची मानसिकता.

कर्जत ग्रामपंचायत असताना रस्ते फार लहान होते. ते रुंदीकरण करण्याचे काम माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे यांनी हाती घेतले होते. त्यावेळी त्यांना खूप विरोध झाला होता. त्याला न जुमानता रस्ते थोडेसे रुंद झाले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण हे रस्ते त्यावेळीदेखील म्हणजे ३५ ते ४० वर्षांपूर्वी हातगाडीवाल्यांनी काबीज केले होते. त्यानंतर कर्जत ग्रुप ग्रामपंचायत आणि दहिवली ग्रामपंचायतीची एकत्रित कर्जत नगरपरिषद जाहीर झाली. ही घटना १९९२ सालची. त्यानंतर १९९४ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सत्ता आली. त्यानंतर १९९९ साली काँग्रेसमध्ये फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती करण्यात आली. त्यावेळी झालेल्या निवडणुकीत सुरेश लाड आमदार झाले.

सुरेश लाड यांनी शहरातील रस्ते काँक्रीट करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला व शहरातील रस्ते रुंद करण्यासाठी स्वतः लक्ष घातले. त्यावेळीही व्यापारी वर्गाने नाराजी दाखविली होती. त्यांना समजावून तर काहींचा विरोध पत्करून त्यांनी दोन्ही बाजारपेठा व शहरातील काही रस्त्यांचे रुंदीकरण घडवून आणले. रस्ते मोठे झाले मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. बाजारपेठेतील रस्त्यांच्या दुतर्फा हातगाडी व फेरी वाल्यांनी ठाण मांडले. खरे तर नगर परिषद परवाना असलेल्या हातगाड्या किती? आणि प्रत्यक्षात हातगाड्या किती? हा म्हणजे संशोधनाचा विषय आहे. त्यांच्यावर ठोस कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. कुणीतरी विरोध केला की, तात्पुरती मलमपट्टी करण्याचे प्रकार होत असतात, मात्र काही दिवसांनी जैसे थे परिस्थिती होते.

कपालेश्वर मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा दरम्यानच्या रस्त्यावर नो हॉकर्स झोन करण्याचे ठरले होते. त्यानंतर त्या रस्त्यावर हातगाडीला बंदी घालण्यात आली होती. हा ठराव करताना त्यावेळी जे नगरसेवक होते. त्यातील दोन-तीन नगरसेवक आत्ता सुद्धा नगर परिषदेत आहेत, मात्र याबाबत ते काहीही करू शकत नाहीत. मध्यंतरी या रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कारवाई करून त्यांना उठवण्यात आले होते, मात्र ही कारवाई औटघटकेची ठरली. आता तर त्या रस्त्यावरून चालणेही कठीण होऊन बसले आहे. आम्ही ज्यांना निवडून दिले. त्यांनी हे काम केले पाहिजे. अशी उघड चर्चा नेहमीच होत असते परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

काही फेरीवाले, हातगाडीवाले रस्त्यावर बसतात. शासनाने रिक्षा परवाने खुले केले त्यामुळे अनेक बेरोजगार युवक रिक्षा व्यवसायात पडले. रस्ते तेच मात्र वाहनांची संख्या दुप्पट, तिप्पट झाल्याने त्यांचे नियोजन करता करता पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज कसरत होते. कर्जत शहरात कोणत्याही चौकात मोकळी जागा नाही. सर्वच ठिकाणी काही रिक्षावाले अगदी बिनदिक्कतपणे रिक्षा उभ्या करतात. एक आहे ज्यावेळी आरटीओंचा कॅम्प असतो तेव्हा यातील काही रिक्षा आडबाजूला लावल्या जातात. याकडेही दुर्लक्ष केले जाते. काही महिन्यांपूर्वी टोविंग वॅन उपलब्ध होती, मात्र पोलीस प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन याची जबाबदारी घेत नसल्याने ती बंद आहे. पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारीही कमी आहेत. त्यामुळे त्याचाही नाईलाज आहे. टोविंग वॅन सुरू असताना चांगली शिस्त लागली होती. वाहतूक कोंडीची समस्याही बऱ्या पैकी सुटली होती, मात्र आता सारे काही आलबेल सुरू आहे.

कर्जत शहरातील फेरीवाले, हातगाडीवाले, रिक्षावाले आणि बेशिस्त वाहन चालक यांना शिस्तीत आणण्यासाठी नियोजनाची गरज आहे. महिला दिनाच्या नंतर एका रिक्षा चालकाने एकमेव रिक्षाचालक असलेल्या महिलेला मारले. ही अतिशय गंभीर घटना होती, मात्र अन्य रिक्षाचालकांनी त्या महिला रिक्षाचालकाला तक्रार नोंदवू नको. अशी विनंती हे प्रकरण बाहेरच्या बाहेर मिटविण्यात आले. हा प्रकार म्हणजे स्त्री दाक्षिण्य वेशीला टांगल्यासारखे झाले आहे. या सर्वांना शिस्त लावायची असेल तर सर्व संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन त्यावर उपाय करण्याची गरज आहे. हे कटू सत्य आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअॅप आणणार 'हे' अपडेट; चॅट करणे होणार अधिक सोपे



व्हॉट्सअॅप हे एक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. हे मेटाच्या मालकीचे आहे. यावरून तुम्ही एकमेकांशी संवाद साधू शकता. तसेच व्हॉट्सअॅप आपल्या ग्राहकांसाठी नवनवीन फीचर्स किंवा काही अपडेट लॉन्च करत असते. व्हॉट्सअॅपवर सध्या दोन अब्जापेक्षा जास्त लोक सक्रिय आहेत. या माध्यमातून लोकं एकमेकांशी २४ तास जोडलेले असतात. तसेच लोक चॅट करण्यासाठी Emoji आणि GIF चादेखील वापर करतात. व्हॉट्सअॅप या संबंधितच एक नवीन अपडेट आपल्या वापरकर्त्यांना देणार आहे. तर हे अपडेट नक्की काय आहे ते जाणून घेउयात.

व्हॉट्सअॅप लवकरच आपल्या वापरकर्त्यांना एक नवीन अपडेट देणार आहे. म्हणजेच व्हॉट्सअॅप वापरकर्त्यांना नवीन २१ ईमोजीचे अपडेट देणार आहे. सध्या हे ईमोजी बीटा टेस्टर्सकडे लाईव्ह करण्यात आले आहेत. जे लवकरच सर्व सामान्य वापरकर्त्यांसाठीदेखील उपलब्ध होणार आहेत. हे नवीन इमोजीचे अपडेट हे १५.० या अपडेटचा एक भाग आहे. याबद्दलची माहिती wabetainfo वेबसाइटने शेअर केली आहे.

व्हॉट्सअॅपद्वारे लाँच होणारे हे ईमोजी थर्ड पार्टी कीबोर्डवर आधीपासूनच होते. मात्र त्यानंतर वापरकर्ते या ईमोजी दुसऱ्या व्यक्तीला शेअर करू शकत नव्हते. अपडेटनंतर हे २१ नवीन ईमोजी तुमच्या ईमोजी लिस्टमध्येदेखील जोडले जाणार आहेत. यामधील थ्री हार्ट हे ईमोजी लोकांना मोठ्या प्रमाणात आवडू शकते.

व्हॉट्सअॅप आणखी एका फीचरवर काम करत आहे. ज्याच्यामध्ये वापरकर्ते अनोळखी नंबरवरून येणारे कॉल्स म्यूट करू शकणार आहेत. तुम्हाला सेटिंगमध्ये हा ऑप्शन मिळेल. हे फिचर तुम्ही सुरू केल्यानंतर तुम्हाला जर का एखाद्या अनोळखी व्यक्तीने कॉल केल्यास तुमचा फोन सायलेंट होईल. तुम्ही कॉल लिस्टमध्ये जाऊन हा कॉल पाहू शकणार आहेत.

# संत एकनाथ षष्ठी



**निमित्त**

श्रीसंत एकनाथ षष्ठी हा दिवस महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर श्री संत एकनाथ महाराज जलसमाधी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. विशेषत: पैठणमध्ये सहा ते सात लाख भाविक ह्या सोहळ्यास उपस्थित असतात. पैठण येथील नाथषष्ठीची वारी वारकरी संप्रदायातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी वारी असून पंढरपूरच्या आषाढी वारी नंतर ह्या वारीस मोठ्या प्रमाणावर वारकरी समाज एकत्रित होतो. विविध ठिकाणांहून आलेल्या ४७५ दिंडया, भानुदास-एकनाथ चा गजर हयामुळे संपूर्ण परिसर न्हाऊन निघतो.

फाल्गून वद्य षष्ठी, सप्तमी व अष्टमी (साधारणत: मार्च महिना) ह्या दिवसांत हा उत्सव साजरा करण्यात येतो. द्वितीयेस गावातील नाथमंदिरातील रांजणाच्या पूजेनं उत्सवाची सुरूवात होते. द्वितीया ते पंचमीपर्यंत श्रीकेशवस्वामीकृत नाथ चरित्राचे पारायण करण्यात येते. पंचमीच्या दिवशी मानकऱ्यांना उत्सवाचे आमंत्रण दिले जाते.

**षष्ठी** – षष्ठीच्या दिवशी पहाटे २ वाजता श्रीविजयी पांडुरंगाच्या मूर्तीस महाभिषेक करण्यात येतो. नाथवंशजांची मानाची पहिली दिंडी दुपारी १२ वाजेच्या सुमारास गावातील मंदिरातून श्रीएकनाथमहाराजांच्या समाधी मंदिराकडे प्रस्थान करते. मंदिरात नाथवंशजांच्या वतीनं वारकरी व हरिदासी कीर्तनं करण्यात येतात. गावातील मंदिरात परतल्यानंतर आरती होते. सोहळ्यासाठी आलेल्या सर्व दिंडया नगर प्रदक्षिणा करून गोदाकाठी आपापल्या फडात/मठात विसावतात.

**सप्तमी** – सप्तमीच्या दिवशी रात्री १२ वाजता नाथांच्या पादुकांची गावातून मिरवणूक काढण्यात येते. त्यास छबिना असे म्हणतात. पहाटेच्या सुमारास पालखी वाळवंटात आल्यानंतर पादुकांना गोदास्नान घालण्यात येते, भारुड सादर केली जातात. सकाळी ७ वाजेच्या सुमारास पालखी गावातील मंदिरात येते. वारकऱ्यांच्या फडांमध्ये भजन कीर्तनादींचे आयोजन करण्यात येते. वाळवंटात कीर्तन ऐकण्यासाठी भाविकांची गर्दी जमते.


**अष्टमी** – अष्टमीच्या दिवशी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास गावातील नाथमंदिरातून काला दिंडी निघते. उदासीमठाजवळील पायऱ्यांवर पावल्या खेळण्यात येतात. हे दृश्य आपल्या डोळ्यात साठविण्यासाठी हजारोंचा समुदाय येथे उपस्थित असतो. समाधी मंदिरात पोचल्यानंतर मंदिराच्या समोरील पटांगणावर टाळमृदुंगाच्या गजरात शेकडो भाविक पावल्या खेळण्यात तल्लिन होऊन जातात. मंदिराच्या बाजूस उंच ठिकाणी गुळ आणि लाह्या यांचे मोठेमोठे लाडू आकर्षकरित्या बांधण्यात येतात.

त्याच्या मध्यभागी काला भरलेली हंडी लटकविलेली असते. सूर्यास्तासमयी 'दत्तात्रय जनार्दन श्री एकनाथ'च्या जयघोषात नाथवंशजांकडून काठीच्या सहाय्यानं ती हंडी फोडण्यात येते. प्रसाद मिळविण्यासाठी भाविकांची झुंबड उडते. परंपरेचे अभंग, गौळणी, आरती झाल्यानंतर गोदावरीच्या वाळवंटात काला वाटण्यात येतो. या तीनही दिवसांमध्ये श्री एकनाथ महाराजांच्या पैठणकर फडातील हजारो वारकरी दिंडीत सहभागी होत असतात. शिवाय इतरही दिंड्या आपआपल्या पध्दतीनं सोहळ्याचा आनंद लुटतात. सद्यस्थितीत पैठण येथे सोहळ्यास येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खान्देश आदी ठिकाणांहून येणाऱ्या भाविकांच्या संख्येत वाढ होत आहे तसेच कोकण, मुंबई, कर्नाटक आदी परिसरातून दिंडया घेवून येण्यासाठी भाविक उत्सुक असल्याने येथे वारकऱ्यांची नव्यानेच भर पडत आहे. नाथषष्ठी हा उत्सव विदेशी लोकांच्याही आकर्षणाचा विषय बनला असुन अनेक विदेशी पर्यटक सोहळा पाहण्यासाठी पैठणास येतात.

**उत्सवाचा इतिहास** – एकनाथ स्वत: आपल्या गुरुंचा जन्मदिवस व पुण्यतिथी म्हणून यादिवशी उत्सव साजरा करीत. पुढे नाथांनीही ह्याच दिवशी जलसमाधी घेतल्याने श्रीएकनाथषष्ठी म्हणून हा दिवस साजरा करण्यात येवू लागला.

**(साभार : संतएकनाथ डॉट ओआरजी)**

**क्लिक...क्लिक...!**




**सातारा : महाराष्ट्राची परंपरा असलेल्या वाई तालुक्यातील बावधन गावच्या बगाड यात्रेला हजारो भाविकांनी हजेरी लावली. या यात्रेचे छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेले छायाचित्र आहे.**

## आरोग्य प्रहर

### कलिंगड खाण्याची 'ही' योग्य वेळ, नाहीतर होईल नुकसान!

उन्हाळ्याचा त्रास कमी करण्यासाठी निसर्गानंच काही फळं या काळात दिलीयत. त्यातलंच एक कलिंगड. जे उन्हाळ्यात मिळतं. कलिंगडात खूप पाणी असतं. आरोग्यासाठी हे फळं उत्तम आहे. याचे अनेक फायदे आहेत. पण कलिंगड खाण्याचाही एक विशिष्ट वेळ असते. वाट्टेल तेव्हा कधीही कलिंगड खाऊन चालत नाही. जर योग्य वेळेत कलिंगड खाल्लं नाही, चुकीच्या वेळेला ते खाल्लं गेलं तर त्याच्या फायद्याऐवजी नुकसानच होईल.



कलिंगड हे अल्कली गुणधर्माचं फळ असल्याने, पित्ताच्या दोषांवर गुणकारी ठरते. उन्हाळ्यात घामातून शरीरातील खनिजे निघून जातात. कलिंगड खाल्ल्याने तहान भागते आणि शरीरातील खनिज द्रव्यांची हानी भरून निघते. सूर्यकिरणांच्या थेट माऱ्यामुळे होणारे रेडिएशनचे परिणाम कमी होतात.कलिंगडातल्या पाण्यानं पोट भरतं. भूक लागत नाही. त्यामुळे तुमचं वजनही वाढत नाही.

पण कलिंगडाचे हे फायदे योग्य वेळेत खाल्ल्याने मिळतील आणि ही वेळ नेमकी कोणती याबाबत तज्ज्ञांनी माहिती दिली आहे. आहारतज्ज्ञ रूपाली महाजन यांनी आपल्या युट्यूब चॅनेलवर हा व्हिडीओ पोस्ट केला आहे,

रूपाली महाजन यांनी सांगितलं, कलिंगड हे ९० टक्के पाणी असतं. यात शुगरही जास्त असतं. त्यामुळे ते कधी आणि कसं खायचं हेसुद्धा महत्त्वाचं आहे. कोणतंही फळ असो ते जेवण म्हणूनच खावं. त्यामुळे कोणत्याही इतर खाद्यपदार्थांसोबत ते खाऊ नका. म्हणजे तुम्हाला कलिंगड खायचं असेल तर ते जेवण किंवा नाश्त्यासोबत खाऊ नका. तर कलिंगडच तुम्ही नाश्ता किंवा जेवण म्हणून खाऊ शकता.

कलिंगड खाण्याच्या एक तास आधी आणि एक तास नंतर काहीच खाऊ नये. कारण हे अॅसिडीक असतं. त्यामुळे याच्यासोबत कोणताही विरुद्ध पदार्थ खाल्ले तर मळमळल्यासारखं वाटेल, अॅसिडीटी होऊ शकते. फायद्याऐवजी शरीराला नुकसान होईल. संध्याकाळी ५ नंतर कलिंगड खाऊ नका. कारण आपली पचनपक्रिया मंदावते. यातील शर्करा अॅसिड निर्मिती करू शकतं.

रात्रीच्या वेळेलाही कलिंगड खाऊ नका कारण ते पचायला जड जातं, असंही अनेक डॉक्टर सांगतात. त्यामुळे यापुढे कलिंगड खाताना वेळेचा नियम पाळा. नक्कीच त्याचा फायदा होईल.

# परतीच्या प्रवासात चाकरमान्यांची परवड

## मुंबई–गोवा महामार्गावर माणगावमध्ये वाहतूक कोंडीचा प्रश्न यंदाही कायम

**माणगाव : प्रतिनिधी**

दरवर्षी होळी उत्सवात नागरिक कोकण व तळ कोकणातील आपल्या मूळगावी होळी साजरी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जातात. यंदाचे वर्षीही या होळी उत्सवात चार दिवस सलग सुट्या आल्याने नागरिक मिळेल त्या वाहनांनी कोकण व तळकोकणात गेले होते. ते परतीच्या प्रवासाला निघाल्यानंतर माणगाव बाजारपेठेत वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला. तासनतास कोकण व तळ कोकणातून येणाऱ्या वाहणाऱ्या रांगा महाड बाजूकडून लागल्या होत्या. माणगावपासून ३ कि.मी. ढालघर फाटा दरम्यान तसेच पुणे बाजूकडून समुद्रावर जाणाऱ्या पर्यटक नागरिक मोठ्या प्रमणात आल्याने निजामपूर बाजूकडून माणगावमध्ये वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे पर्यटक नागरिक ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली.

माणगाव वाहतूक पोलीस ही कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न करीत होते. मात्र वाहनांचे रांगा मोठ्या प्रमाणात लागल्याने पोलिसांची चागलीच दमछाक झाली. माणगाव बाजारपेठे बाहेरून बायपासचे काम दोन वर्षापासून थांबले आहे. त्यामुळे प्रवाशांनी ठेकेदाराच्या नावाने शिमगाच केला आहे.

### ...तरच प्रश्न सुटेल!

**मुंबई–गोवा महामार्गावर महाड बाजूकडून वाहनाच्या रांगा महामार्गावर दिसत होत्या. पुणे बाजूकडून समुद्र व पर्यटना स्थळावर मौज मजा करण्यासाठी आपल्या कुटुंब व मित्रासह ग्रुप वर्षा सहलीसाठी मोठ्या प्रमाणात आले आहेत. त्यामुळे सर्वांनाच या वाहतुक कोंडीचा फटका बसला. मुंबई–गोवा महामार्गावरील इंदापूर, माणगाव येथील बायपासचे काम पूर्ण झाल्यास माणगावमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा सुटेल. अशी आशा नागरिकांना वाटत असून वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस तसेच महामार्ग पोलीस व माणगाव पोलीस विशेष प्रयत्न करीत आहेत.**



दरवर्षीप्रमाणे यंदाचे वर्षीही माणगाव बाजारपेठेत प्रवासी नागरिकांना वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला आहे. मुंबई बाजूकडून माणगावकडे होळी उत्सवासाठी जाताना आठ दिवसापूर्वी सुमारे ३ किमी अंतरावर वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तसेच पुणे बाजूकडून येणाऱ्या पर्यटक प्रवाशांच्या वाहनांचे रांगा सुमारे दीड किमी अंतरावर लागल्या होत्या. त्यामुळे वाहतूक कोंडीशी सामना प्रवासी नागरिकांना करावा लागला होता. तसाच होळी उत्सवानंतर परतीच्या प्रवासाला निघालेल्या प्रवासी नागरिकांना भर उन्हाळ्याच्या दिवसात पाण्यासाठी हाल झाले. त्यामुळे त्यांच्या परतीच्या उत्साहावर वाहतूक कोंडीचे पाणीच पडले. यंदाचे वर्षी ६ मार्च सोमवारी होळी सण तर ७ मार्चला मंगळवारी धुलीवंदन असल्याने विविध भागातून नागरिक ता. ४ मार्च रोजी आपल्या मूळ गावी गेले होते. होळी सण व शिवजयंतीनंतर आपल्या मूळ गावावरून मुंबई, ठाणे, सुरत भागात पुन्हा कामावर जाण्यासाठी नागरिकांनी ११ मार्च रोजी परतीचा प्रवास सुरु केला आहे. त्यातच शनिवार, रविवार सुट्टीचे दिवस असल्याने पुणे, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील पर्यटक श्रीवर्धन बिच, हरीहरेश्वर, दिवे आगार, दापोली, खेड, मंडणगड, मुरुड जंजिरा, काशीद बीच, अलिबाग बीच यासह अनेक पर्यटन स्थळाकडे मौज मजा करण्यासाठी माणगाव बाजारपेठेतून गेल्यामुळे बाजारपेठेतील वाहतूक कोंडीत अधिकच भर पडली.

# कर्जतच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास रुग्णवाहिका दिली भेट



**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील सुप्रसिद्ध व्यावसायिक तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे सदस्य शैलेंद्र हनुमंते यांच्या पुढाकाराने आणि त्यांचे कुटुंबीय, मित्रपरिवार, देसीबोल इन्फोटेक कंपनीतील सहकारी तसेच योग विद्या प्रणिक हीलिंग फाऊंडेशन ऑफ महाराष्ट्र या संस्थेच्या विषेश सहकार्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या समाजसेवी संस्थेस नवीन रुग्णवाहीका भेट देण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले यांच्या हाती किल्ली सुपूर्द करण्यात आली.

रॉयल कॅम्प येथे यानिमित्त समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. योग विद्या प्रणिकी हीलिंग फाउंडेशन ऑफ महाराष्ट्रचे संस्थापक गुरु जी. एम. उघड आणि शैलेंद्र हनुमंते यांचे वडील दिवंगत सुभाष हनुमंते यांच्या स्मृती प्रित्यर्थ ही रुग्णवाहीका देण्यात आली.

या प्रसंगी योग विद्या प्रणिक हीलिंग संस्थेच्या नीताबेन जोबानपुत्र, शेखीना चालीसा, कर्जत शहराच्या नगराध्याक्षा सुवर्णा जोशी, शैलेंद्र हनुमंते, त्यांचे कुटुंबीय विभावरी हनुमंते, सारिका बिवलकर, अभय हनुमंते, प्रसन्न हनुमंते, तसेच देसी बोल कंपनीतील सहकारी बिनिता शर्मा, रिंकू मथारू, सोहेल ठाकूर, योग विद्या परिवारातील आदित्य राऊल, शशांक मोरे, अमेय प्रधान, अमोल जोशी, शशांक मोरे, प्रार्थमेश मेस्त्री, सांगम अध्यक्ष आशिष गोखले, जेष्ठ सदस्य केतन जोशी, भालचंद्र जोशी, विवेक दांडेकर, सदानंद जोशी, अभिजीत मराठे, विवेक भागवत, मंगेश जोशी, मिलींद खंडागळे, कल्पेश शहा आदी सदस्य उपस्थित होते.

या प्रसंगी कर्जत नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. या रुग्णावाहिकेच्या माध्यमातून हजारो रुग्णांची सेवा घडेल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी शहरातील जेष्ठ नागरिकांपैकी विजय हरिश्चंद्रे, विराग मेढी, सुमेश शेट्ये, निलेश चौडीये,निलेश परदेशीं, समीर लाड, प्रसाद दळवी, जीमेश शहा उपस्थित होते.



# रोहा महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा येथील कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ.कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व एक्सेल इंडस्ट्री लिमिटेड धाटाव यांच्या संयुक्त विद्यमाने या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते.

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेले आपत्ती व्यवस्थापन शिबीरास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके, एक्सेल इंडस्ट्रीचे सुरक्षा अधिकारी पुरषोत्तम पवार, कमळाकर कदम, व्ही. आर. टी. आय, रोहा संस्थेचे प्रमुख व एक्सेल इंडस्ट्रीचे सी. एस. आर प्रमुख सुशिल रुळेकर, व्ही. आर.टी. आय, रोहा संस्थेचे अकाऊंटंट प्रसाद भोईर प्रा. तुळशिदास मोकल, प्रा. शत्रुघ्न लोहकरे, प्रा. सुकुमार पाटील, डॉ. अनिल शिंदे, प्रा. सीमा भोसले, डॉ. कमलाकर कांबळे, डॉ. सम्राट जाधव, प्रा. अनंत थोरात, प्रा. शिल्पा खाडे व प्रा. वैशाली कानावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सर्वप्रथम एक्सेल इंडस्ट्रीचे सुरक्षा अधिकारी कमलाकर कदम यांनी उपस्थितांना आपत्ती म्हणजे काय? नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती कोणत्या प्रकारची असते व जर आपत्ती निर्माण झाली तर तीचे व्यवस्थापन कोणत्या पद्धतीने करणे आवश्यक असते याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. नंतर स्वतः प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून उपस्थितांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे दिले.

प्रास्ताविक व्ही. आर. टी. आय, रोहा संस्थेचे प्रमुख व एक्सेल इंडस्ट्रीचे सी.एस. आर प्रमुख सुशिल रुळेकर यांनी केले तर आभार प्रा. तुळशिदास मोकल यांनी मानले. हे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर यशस्वी करण्यासाठी एक्सेल इंडस्ट्रीच्या सुरक्षा विभागाची महत्वपूर्ण मदत झाली.

# शिहू येथे तिथीनुसार शिवजयंती साजरी

**नागोठणे : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीनुसार शिहू येथे कोकण कडा मित्र मंडळाचे अमृत पाटील, अध्यक्ष रवींद्र म्हात्रे, उपाध्यक्ष हरेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साही वातावरणात झाली. त्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पहाटे किल्ले रायगडवरून शिवज्योत आणून महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. सायंकाळी ४ वाजता पालखी मिरवणूक सोहळा या मध्ये महिलांनी पारंपरिक वेशभूषा साकारून लेझिम नृत्य सादर केले. तसेच शिवशाहीर लक्ष्मण नाकते यांनी महाराजांच्या जीवनावर आधारित गीत गायन करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. मुद्रा डान्स अकॅडमी शिहू, पाच्यापूर डान्स अकॅडमी यांचे नृत्य सादरीकरण, रात्री ९ वाजता शिवव्याख्याते सचिन करडे यांचं शिवव्याख्यान, या कार्यक्रमाचे आकर्षण ६ वर्षीय गौरव रायमल याचे साहसी मैदाणी खेळानी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमासाठी शिवप्रेमी प्रफुल म्हात्रे, जितेश गदमले, विशाल म्हात्रे, शुभंम मोकल, भारतीय सैनिक अमृत गदमले, प्रसाद गदमले, मनोज मोकल, भास्कर म्हात्रे, सुधीर पाटील, दिनेश म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, रोशन पाटील, सागर गदमले, अक्षय कुथे, करण शेळके, आदित्य पाटील, अविनाश पाटील, योगीराज पाटील, अक्षय मोकल, कृतिक पाटील, आशिष म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेतली. सूत्रसंचालन विजय पाटील यांनी केले. या जन्मोत्सव सोहळ्यास विविध मान्यवरांनी भेट दिली.



# अलिबाग पंचायत समितीत महिलांसाठी आत्मसंरक्षण प्रशिक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त अलिबाग पंचायत समितीमधील महिला कर्मचाऱ्यांसाठी शुक्रवारी ( दि. १०) आत्मसंरक्षण प्रशिक्षण देण्यात आले. अलिबाग पंचायत समिती येथे महिला तक्रार निवारण समितीची सभा पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी महिलांना हे मोफत कराटे प्रशिक्षण देण्यात आले.

अलिबाग पंचायत समिती महिला तक्रार निवारण समिती व अँटीकरप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया डिस्ट्रिक्ट रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने हे महिलांसाठी आत्मसंरक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते.



अलिबाग पंचायत समिती महिला तक्रार निवारण समिती अध्यक्ष तथा अलिबाग पंचायत समिती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. मेघा खवसकर यांनी हे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. अँटीकरप्शन फाउंडेशन ऑफ इंडियाचे डिस्ट्रिक्ट चीफ इन्चार्ज रुपेश दांडेकर व महिला पोलिस अक्षता रुपेश दांडेकर यांनी महिलांना प्रशिक्षण दिले. सुत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी श्वेता कदम यांनी केले. त्रिशाली सोनवडेकर यांनी आभर मानले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification:

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-02/ 23-24 **RFx No. 7000026594** | Hiring of Light Motor Vehicle (Ertiga or Equivalent) for Hot Line Unit Kharghar for One Year from 01.04.2023 to 31.03.2024 **Tender Fee:** Rs. 500/- + GST | Limited to Rs. 6 Lakh |

**EMD** 1% of Estimated Cost **Submission of Bids:** from 10.03.2023 at 18:30 Hrs to 17.03.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 20.03.2023 @ 10:00 Hrs.

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9167026141 e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**



## जाहीर नोटीस

**सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी**

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत शिवधारा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची आहे. त्यासाठी मान्यवर विकासकांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

**मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे**

गट नं. २४, हिस्सा नं. १ ते १२ कोप्रोली, ता. पनवेल, पो. नेरे, जि. रायगड, एकूण क्षेत्र ६४०० चौ.मी.

**संस्थेचे नाव व पत्ता**

शिवधारा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पनवेल (नो. क्र. आरजीडी/ पीडब्ल्यूएल/एचएसजी/टीसी २२८२/२००९–२०१०)
कोप्रोली, पो.नेरे, ता. पनवेल, जि. रायगड

प्रकल्प व्यवस्थापन अधिकारी (P.M.C.) यांचा पत्ता पी.जी. स्क्वेअर, रियालिटी प्रा.लि. १७. उषा कबीर बिल्डींग, प्लॉट नं. ४२, सेक्टर नं. १९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (वेस्ट), मो.नं. ९८३३९९०९९८

**ना परतावा**

इच्छुक विकासकांनी निविदा अर्ज खालील पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधून रक्कम रु. १०,०००/– (Demand Draft) ना परतावा भरून दिनांक १३/०३/२०२३ ते १९/०३/२०२३ या काळात निविदा मसुदा उपलब्ध करून दिला जाईल. इच्छुक विकासकांनी निविदा मसुदा दिनांक १९/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत प्रकल्प व्यवस्थापन अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावे.

मोहोरबंद निविदा १९/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा १९/०३/२०२३ रोजी संध्याकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत संस्थेच्या कार्यालयात उघडून यावर पुढील निर्णय घेण्यात येईल.

एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा पूर्ण अधिकार संस्था व P.M.C. प्रकल्प व्यवस्थापन अधिकारी यांच्याकडे राहील याची नोंद घ्यावी. निविदा संदर्भात अंतिम निर्णय व्यवस्थापन समिती व P.M.C. यांचा राहील.

**व्यवस्थापकीय समिती**

१) तुळशिराम बानु पवार – ९८३३४२२७८१
२) रोशन मधुकर काकडे – ८३६९३५१२०७
३) सिध्दार्थ कृष्णा कासारे – ८४२५९२९८०९
४) प्रभाकर P.M.C. – ९८३३९९०९९८


टिप : १) निविदा मसुदा प्रकल्प व्यवस्थापन अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये जमा कराव्यात.
२) ना परतावा Demand Draft रु. १०,०००/– Shivdhara Co-Operative Housing Society Ltd. यांच्या नावाने द्यावा.

**सही/–**
**आपला विश्वासू**
**शिवधारा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कोप्रोली**
**अध्यक्ष सचिव खजिनदार**


# रेवदंडा–चौल येथे शिवजयंती उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा–चौल सार्वजनिक शिवजयंती उत्सव रेवदंडा पारनाका येथे मोठया उत्साहात संपन्न झाला, रेवदंडा पारनाका येथे शिवप्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली होती, तत्पुर्वी रेवदंडा आग्रेनगर ते रेवदंडा पारनाका अशी भव्य शिवप्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी साई मित्रमंडळाने रायगडहून आणलेल्या शिवज्योतीचे भव्य स्वागत करण्यात आले.



प्रतिवर्षी रेवदंडा पारनाका येथे रेवदंडा–चौल सार्वजनिक शिवजयंती उत्सव साजरा करण्यात येतो, त्यानिमित्त रेवदंडा ग्रामपंचायतीच्या प्रांगणात भव्य मंडप उभारणात येऊन परिसर भगवेमय झाले होते, आकर्षक विदयुत रोषणाई, भगव्या पताका, भगवे झेंडे आणी छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणाने शिवजयंती उत्सव दिमाखदार झाला.

यावेळी शिवप्रतिमेची मिरवणूकीत माजी राजिप विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, सामाजीक कार्यकर्ते शरद गोंधळी, अमिर ठाकूर उर्फ पिंटयाशेठ, जेष्ठ नेते अशोक नाईक, मारूती भगत, चौल ग्रा.प. सरपंच प्रतिभा पवार, उपसरपंच अजीत गुरव,आनंद म्हात्रे, रेवदंडा ग्रा.प.सदस्या शिल्पा ठाकूर, ग्रा.प.सदस्या नेत्रा पोसणे, चौल ग्रा.प.सदस्य अजीत मिसाळ, चौल शाखा प्रमुख घरत, रेवदंडा शाखा प्रमुख प्रमोद म्हात्रे, युवा सेना अधिकारी हर्षल घरत, युवासेना अधिकारी तेजस शिंदे, रवी शेळके, निलेश गाडे, सुरेंद्र गोंधळी, ओमकार तांबडकर, संस्कार म्हात्रे, सुराराम माळी,अमित म्हात्रे आदीसह मोठया संख्येने रेवदंडा व चौल ग्रामस्थ, युवावर्ग व महिलावर्ग यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन तेजस शिंदे यांनी केले.

पारनाका येथे शिवप्रतिमेची मिरवणूकीने आगमन झाल्यावर उत्सव मंडपामध्ये प्रतिष्ठापना करण्यात आली. तेथे शिवप्रतिमेस प्रारंभी राजिप विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, शरद गोंधळी, अशोक नाईक, चौल सरपंच प्रतिभा पवार, उपसरपंच अजीत गुरव, मारूती भगत यांनी प्रारंभी शिवप्रतिमेस पुष्पमालिका अर्पण केली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी परिसरत दणाणून गेला. सायंकाळी भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना क्र. २**
**ई निविदा सूचना क्र. ७२/२०२२-२०२३ (मुंबई) करीता**

दिनांक ०६/०२/२०२३ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई,दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक जागरूक टाइम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीताच्या ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धेबाबत व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र.. खारफुटीतील सध्याची अस्तित्वातील सांडपाणी निःसारण वाहिनी बदलणे आणि सांडपाणी निःसारण वाहिनी वाधिवली खाडीत ३.३० कि.मी.ने वाढविणे. |

वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २७/०३/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १६/०३/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक



हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# निवडक

## तुर्भे परिसरात शेकडो झाडे जळाली

**नवी मुंबई :** तुर्भे विभागातील एमआयडीसीला लागून असलेल्या चुनाभट्टी डोंगरावर शनिवारी आग लागली. या आगीत शेकडो झाडे जळून खाक झाल्याचे पाहण्यास मिळाले. नवी मुंबईत ठाणे बेलापूर मार्गावर एमआयडीसी विभाग व झोपडपट्टी विभाग वसलेला आहे. तुर्भे चुनाभट्टी भागात डोंगर व झोपडपट्टी भाग आहे. या ठिकाणी भंगार काम सुरू असतानाच ठिणगी उडून वाळलेल्या गवताला आग लागल्याचे स्थानिकांनी सांगितले. वाळलेल्या गवताने वाऱ्यामुळे पेट घेत काही क्षणात मोठा परिसर व्यापला. त्यात शेकडो झाडे होरपळली.

## नेरूळमध्ये विद्युत खांब कोसळला

**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर १६ येथे दोन महिन्यांपूर्वी नव्याने बसवलेला विद्युतखांब निखळून रस्त्यावर पडला. ही घटना शुक्रवारी घडली. विशेष म्हणजे शहरात नव्याने मजबूत आणि कॉन्क्रीट पाया असलेला व काही आठवड्यापूर्वी हा खांब बसवण्यात आला होता. हा खांब एका सोसायटीच्या सुरक्षा भिंतीवर पडला. सुदैवाने या वेळी कोणी पायी जात नव्हते वा वाहनही या खाली आले नाही. त्यामुळे दुर्घटना टळली.

## चिरनेरच्या महागणपती दर्शनासाठी गर्दी



**उरण :** चिरनेर महागणपती तीर्थ क्षेत्रात संकष्ट चतुर्थी निमित्ताने शनिवारी हजारो भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे चार वाजता श्रींच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले असल्याची माहिती गणपती देवस्थान प्रशासनाचे मंगेश पाटील आणि महेंद्र पाटील यांनी दिली. महागणपती देवस्थानामुळे दर महिन्याच्या संकष्ट चतुर्थीला चिरनेर आणि परिसरातील नागरिकांना रोजगार मिळत आहे. दरम्यान, भक्तांना सुरळीत दर्शन घेता यावे, यासाठी गणपती प्रशासनाने चांगली व्यवस्था केली होती.

## यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**नवी मुंबई :** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती रविवारी (दि. १२) कोकण भवन येथे साजरी करण्यात आली. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी कोकण भवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## चिमुकल्यावर हृदय शस्त्रक्रिया

**नवी मुंबई :** अकाली जन्मलेल्या आणि जन्मजात गंभीर हृदयरोग आणि मूत्रपिंड पूर्णपणे निकामी झालेल्या मॉरिशस येथील १० दिवसांच्या बाळाला नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्स येथे हृदयरोगावरील जीवनदान देणारी प्रक्रिया करण्यासाठी ४६०० किमी अंतर पार करून भारतात आणण्यात आले. या बाळाच्या महाधमनीचा अरुंद भाग रुंद करण्यासाठी ऍब्जर्बेबल (शोषणयोग्य) स्टेंट बसवण्यात आले. ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली आणि बाळाला तीन दिवसांनी यांत्रिक व्हेंटिलेटरच्या मदतीशिवाय श्वास घेता आला.

## मयूर व रूपाली यांचे अभिनंदन



**नवी मुंबई :** आसाम गोवाहाटी येथे आयोजित चौथ्या आशियाई आंतरराष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी भारताच्या पुरुष संघाच्या प्रशिक्षकपदी रा फ नाईक खो-खो संघाचे प्रशिक्षक मयूर पालांडे यांची निवड करण्यात आली आहे. तर भारताच्या महिला संघातदेखील रा फ नाईक संघाची खो-खो पटू रूपाली बडे हीची निवड झाली आहे. त्याबद्दल दोघांचे माजी आमदार संदीप नाईक यांनी अभिनंदन केले.



**नवी मुंबई : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी महापालिका मुख्यालयात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. या वेळी महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# नागरिकांच्या हरकतींना प्राधान्य द्यावे

## प्रारूप विकास आराखड्यावरील सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्याबाबत शहरप्रती जागृत नागरिकांनी दाखल केलेल्या हरकती व सूचनांसंदर्भातील प्रभावी जनजागृती न करता, पालिकेने घेलेली सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दशरथ भगत यांनी केली आहे.



नवी मुंबई महापालिकेने तब्बल ३३ वर्षानंतर शहर प्रारूप विकास आराखडा जाहीर केला आहे. प्रत्येक २० वर्षानंतर शहरांचा विकास आराखडा जाहीर करणे आवश्यक असतांना, महापालिकेने शहराचा प्रारुप विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात दिरंगाई केली. सिडकोने भविष्यातील शहराची तीन लाख लोकसंख्येचा विचार जाहीर केला होता. आज शहरांची लोकसंख्या १५ लाखांपेक्षा जास्त असताना, महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्यावर या शहराप्रति जागृत असलेल्या १५ हजार नागरिकांनी आपल्या सुचना व हरकती दिल्या आहेत.

प्रारुप विकास आराखड्यावर प्राप्त झालेल्या हरकती आणि सुचनांवरील सुनावणीबाबत महापालिकेने तब्बल सहा महिने उशीर केला आहे. शहराप्रती जागरूक असलेल्या नागरिकांनी दाखल केलेल्या हरकती व सुचना स्मार्ट सिटी संबंधित सुवर्ण विकास सुचनावरील सुनावणीसाठी सुवर्ण विकास सुचना धारकांना उपस्थित राहता यावे यासाठी, वर्तमानपत्रात, सर्व सुवर्ण विकास सुचना धारक यांचे नाव, पत्ता सहित जाहिरात प्रसिद्ध करावी, तसेच, सन्मानाने पत्र पाठवून त्यांना सुनावणी दरम्यान, उपस्थित राहण्यासंदर्भात कळविण्यात यावे, मात्र एकुण सुवर्ण विकास सूचना धारकांपैकी काहींना नोटिसा पाठवुन उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले आहे. पालिकेच्या या नोटीसमुळे नागरिकांमध्ये भिती निर्माण झाली असल्याचा आरोप दशरथ भगत यांनी पत्रकार परिषदेत केला.

### भाजप नेते दशरथ भगत यांची पत्रकार परिषद

*प्रारूप विकास आराखड्यावर ३१ ऑगस्ट-२०२२ पर्यंत सुचना आणि हरकती प्राप्त झाल्यानंतर, त्यावर सुनावणी निश्चित होईपर्यंत सुवर्ण विकास सुचना धारकांना सतत पत्राद्वारे तसेच वर्तमान पत्रात आठवण करून देणे आवश्यक असताना आपण केलेल्या सुचना व हरकतीचे विसर पडावा म्हणून महापालिकेने सुनावणीला विलंब केल्याचे सांगत, हरकती व सूचनांवर सुनावणीबाबत मोठया प्रमाणात जनजागृती करावी. तसेच, सर्व सुनावणी पारदर्शक व्हावी यासाठी महापालिकेने जाहीर केलेली सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी दशरथ भगत यांनी पत्रकार परिषदेत केली. याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले.*

# महिलांसाठी लवकरच अद्ययावत व्यायामशाळा

**आमदार गणेश नाईक यांची घणसोलीत घोषणा**

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरिकांच्या मागणीनुसार आमदार गणेश नाईक यांनी घणसोलीमध्ये महिलांकरिता बंदिस्त, अद्ययावत व्यायामशाळा बांधण्याकरता दीड कोटी रुपयांचा स्थानिक आमदार विकास निधी देणार असल्याचे जाहीर केले आहे.



माजी नगरसेवक प्रशांत पाटील, माजी नगरसेविका सुवर्णा पाटील, कमलताई पाटील, सामाजिक कार्यकर्ते यज्ञेश प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशांत पाटील मित्र मंडळ यांच्या वतीने शिवजयंतीचे औचित्य साधून घणसोली येथील सेंट्रल पार्कमध्ये हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या हळदीकुंकू समारंभाला आमदार गणेश नाईक यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. या वेळी माजी नगरसेवक घनश्याम मढवी, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीपुत्र सोडगी, ॲड. अनिता पाटील, सामाजिक कार्यकर्त्या ललिता मढवी, मुकेश राजपुरोहित, भगवती पगारिया, मोहन जाधव, आशा शेगदार आदी उपस्थित होती.

माजी नगरसेविका कमलताई पाटील यांनी नवी मुंबई स्तरावर महिलांसाठी काम केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वर्गीय माजी नगरसेवक संजय पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पाटील यांच्या बरोबरच नगरसेवक प्रशांत पाटील, सुवर्णा पाटील यांनी घणसोली गाव आणि नोडची सेवा केल्याचे लोकनेते आमदार नाईक म्हणाले.

प्रशांत पाटील यांनी मागणी केल्यानुसार सेंट्रल पार्कमध्ये खास महिलांसाठी आधुनिक जिम उभे करण्यासाठी एक कोटी रुपयांचा आमदार निधी आणि या जिममधील साहित्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी दिल्याची घोषणा केली. लवकरच महापालिकेच्या माध्यमातून ही व्यायाम शाळा बांधण्याचे नियोजन करण्यात येईल व उद्घाटनही होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोकनेते आमदार गणेश नाईक आणि ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे प्रथम आमदार संदीप नाईक यांनी घणसोलीसाठी भरभरून दिले आहे, अशी प्रतिक्रिया प्रशांत पाटील यांनी दिली. सेक्टर एक येथे गार्डन, सेक्टर ८ येथील रुग्णालय, समाज मंदिर, जेष्ठांना बसण्यासाठी आसन व्यवस्था या सुविधांसाठी निधी प्राप्त करून दिलेला आहे. महिलांसाठी बंदिस्त व्यायाम शाळेसाठी दीड कोटी रुपयांचा निधी तातडीने जाहीर केला. त्याबद्दल लोकनेते आमदार गणेश नाईक यांचे प्रशांत पाटील यांनी आभार मानले.

# 'एमपीएससी'ला हवी नव्या इमारतीची एनओसी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत सीबीडी बेलापूर येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नव्याने उभारण्यात येणाऱ्या नियोजित १२ मजली इमारतींच्या बांधकामास गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये राज्य सरकारने मान्यता दिली होती. त्यानंतर एमपीएससीने आता नवी मुंबई महापालिकेकडे बांधकाम सुरू करण्याची परवानगी, फायर एनओसी आणि पर्यावरण विभागाच्या ना हरकत दाखल्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे.

या इमारतीसाठी येणाऱ्या २८२ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चाचा प्रस्ताव उच्चाधिकारी सचिव समितीच्या बैठकीमध्ये गेल्या वर्षी मान्यतेसाठी ठेवला होता. त्यानंतर मूळ प्रशासकीय मान्यता रद्द करुन नव्याने सादर केलेल्या खर्चाच्या प्रस्तावाला समितीने मान्यता दिली होती. मान्यता मिळाल्यानंतर एमपीएससीने बांधकामासाठी इमारतींच्या आवश्यक असलेल्या परवानग्यांसाठी पत्रव्यवहार सुरु केले आहेत. महत्वाची असलेली पर्यावरण आणि फायर विभागाची ना हरकत परवानगी मिळावी यासाठी प्रस्ताव पाठवला आहे. शिवाय नवी मुंबई महापालिकेकडे बांधकाम सुरु करण्यासंदर्भात परवानगी घेतली आहे.

# घणसोलीत शिवजयंती साजरी



**नवी मुंबई : बातमीदार**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे शिवसेना या पक्षाच्या वतीने घणसोली सेक्टर ७ सिंपलेक्स येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी शिवसेना या पक्षाचे उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख,उपविभाग प्रमुख शाखाप्रमुख महिला आघाडी युवा सेना वैद्यकीय कक्ष पदाधिकारी व सर्व शिवसैनिक यांच्या वतीने शिवजयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. ऊर्मिता राजपूत प्रस्तुत महाराष्ट्राची लोकरंग हा सासंकृतिक परंपरे वर आधारित नृत्याविष्कार सादर करण्यात आला. या वेळी नवी मुंबई शिवसेना या पक्षाचे जिल्हाप्रमुख विजय चौगुले, अजय पाटील उपजिल्हाप्रमुख घणसोली, शहरप्रमुख सुरेश भिलारे यांची विशेष उपस्थिती होती. या वेळी उपशहरप्रमुख महेश चोरगे यांनी नवी मुंबई जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांचे स्वागत केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपजिल्हा प्रमुख सुरेश सकपाळ, उपशहर प्रमुख शंकर मोरे, उपशहर प्रमुख महेश चोरगे, उपशहर प्रमुख सूर्यकांत वाघमारे, विभागप्रमुख विजय शिंदे,विभाग प्रमुख प्रमोद लाड उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख युवासेनेचे सर्व पदाधिकारी स्थानिक माजी नगरसेविका दिपाली सकपाळ व सर्व महिला आघाडी यांनी प्रयत्न केले. महिला जिल्हाप्रमुख शितल कचरे, नवी मुंबईचे युवा नेते सौरभ दादा शिंदे, मोरया प्रतिष्ठानचे संस्थापक नितीन पार्टे उपस्थित होते.

# बेलापूरमध्ये कांदळवनात स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत बेलापूर कार्यक्षेत्रात शिवमंदिर सागरी किनारा येथे शनिवारी (दि. ११) स्वच्छता मोहीम घेण्यात आली. या वेळी कांडळवनातील प्लॅस्टिक कचरा उचलण्यात आला. सध्या नवी मुंबईत स्वच्छ सर्वेक्षण सुरू आहे. त्यासाठी पालिका विविध प्रकारे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करत आहे. यावेळी अनेक गोण्या भरून कचरा गोळा करण्यात आला. हा कचरा तुर्भे डंपिंग ग्राऊंडवर पुढील प्रक्रियेसाठी पाठवण्यात आला आहे.

या वेळी युथ ब्रँड अँबेसिडर, आंतरराष्ट्रीय जलतरणपटू शुभम वनमाळी, नवी मुंबई महापालिका उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनवणे, स्वच्छता अधिकारी पवन कोवे, बेलापूर विभाग कार्यालयातील अधिकारी कर्मचारी वर्ग, साफसफाई कामगार तसेच मँगोज सोल्जरचे सदस्य ,ज्ञानदीप स्कूल व कॉलेजचे विद्यार्थी, फादर एंगल इन्स्टिट्यूट ऑफ कॉलेज वाशी एनएसएस विद्यार्थी, एसआयईएस कॉलेज नेरूळ एनएसएस विद्यार्थी, तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज एनएसएस विद्यार्थी, सरस्वती इंजिनिअरिंग कॉलेज एनएसएस विद्यार्थी उपस्थित होते.



## पनवेल आयटीआयमध्ये चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील (आयटीआय) वर्कशॉपमध्ये चोरी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील वर्कशॉपमधील बाथरूमच्या खिडकीतून दोन अज्ञात व्यक्तींनी आत प्रवेश केला. यानंतर वर्कशॉपचे शटर उचकटून व त्यामधून ग्रँडिग मशीनचे पार्ट्स व इतर साहित्य असा मिळून जवळपास १० हजार ९०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जाळीत अडकलेल्या अजगराला जीवदान

**नवी मुंबई :** पुनर्वसु फाऊंडेशन संस्थेला सीबीडी बेलापूर सेक्टर- ८ येथे स्थित असलेल्या अंबाजी गो शाळा येथे एक सर्प असल्याची माहिती संस्थेचे सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांना देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. लोखंडी जाळ्यात एक अजगर अडकले होते. या अजगराची प्रयत्नांची पराकाष्ठा करत सुटका करण्यात आली.



यानंतर या आजाराची तपासणी करण्यात आली. त्यात या अजगराला जाळीच्या ता किरकोळ दुखापत झाली होती. ती जखम आपोआप भरून येण्याची शक्यता असल्याने या अजगरची माहिती वनविभागास देऊन त्याला जंगलात सोडून देण्यात आले.

# नवी मुंबईत सायक्लोथॉनला प्रतिसाद

## सायकलपटूंनी दिला पर्यावरणपूरक संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेसोबतच पर्यावरणविषयी अत्यंत जागरूक असणाऱ्या नागरिकांमुळेच नवी मुंबई स्वच्छतेसह पर्यावरण रक्षण, संवर्धनातही राज्यात नेहमीच आघाडीवर राहिली असून रविवारी (दि. १२) माझी वसुंधरा अभियानांतर्गत आयोजित सायक्लोथॉनला अडीचशेहून अधिक पर्यावरणप्रेमी नागरिकांनी उत्साही प्रतिसाद दिला.

माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत नवी मुंबई महापालिका क्रीडा व सांस्कृतिक विभाग आणि सायकलिस्ट क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सायक्लोथॉनचा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी हिरवा झेंडा दाखवित शुभारंभ केला तसेच माझी वसुंधरा अभियानाची सामुहिक शपथ दिली.



या वेळी अतिरिक्त आयुक्त तथा नवी मुंबई महापालिका माझी वसुंधरा अभियानच्या नोडल अधिकारी सुजाता ढोले, उपायुक्त सोमनाथ पोटरे, डॉ. बाबासाहेब राजळे, डॉ. श्रीराम पवार, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, सायकलिस्ट क्लब ऑफ इंडियाचे प्रमुख जय पाटील आदी उपस्थित होते.

मोराज सर्कल ते नवी मुंबई महापालिका मुख्यालयापर्यंतच्या साधारणत: आठ किमी अंतराच्या सायक्लोथॉनमध्ये सहभागी होत हे अंतर पार करणाऱ्या सायकलपटूंना मुख्यालयाठिकाणी प्रशस्तिपत्रे प्रदान करून सन्मानित करण्यात आले. वय वर्षे चार ते वयाची साठी पार करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटांतील नागरिकांनी सायक्लोथॉनमध्ये उत्साही सहभाग घेत हा पर्यावरणशील उपक्रम यशस्वी केला. यामध्ये हर्ष विजय जाधव हा अवघा चार वर्षांचा मुलगा विशेष आकर्षण ठरला.

जीवेत् शरदः शतम्!
नीलम कोळी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
सरस्वती कांबळे

# आम्ही विकासकामे करणार, तुम्ही फक्त आशीर्वाद द्या!

## आमदार भरत गोगावले यांचे माणगावमध्ये प्रतिपादन

**माणगाव : प्रतिनिधी**

आम्ही विकासकामे जरूर करणार, तुम्ही फक्त पाच वर्षातून एकदा आम्हाला आशीर्वाद द्या असे प्रतिपादन शिवसेना उपनेते तथा पक्षप्रतोद व महाड, पोलादपूर, माणगावचे आमदार भरत गोगावले यांनी कांदळगाव बुद्रुक (बांदळवाडी) येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.



माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागातील कडापे ग्रामपंचायत हद्दीतील येरद गावातील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता भूमिपूजन २० लाख रु. निधी, शासनाच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत येरद नळपाणी पुरवठा योजना भूमिपूजन ६४ लाख रु. निधी, कडापे ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती उदघाटन ५ लाख रु. निधी, कांदळगाव बुद्रुक येथे शासनाच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत नळपाणी पुरवठा योजना भूमिपूजन ९० लाख रु. निधी, बांदळवाडी जोडरस्ता भूमिपूजन १० लाख रु. निधी अशा जवळपास २ कोटी रु. च्या विविध विकासकामांचा शुभारंभ आ. भरत गोगावले यांच्या हस्ते शनिवारी झाला.

यावेळी बांदळवाडी येथे झालेल्या सभेत आ. गोगावले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सभेला शिवसेना माणगाव तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, कडापे ग्रामपंचायत सरपंच मारुती मोकाशे, माणगाव पं.स.माजी सभापती आप्पा म्हामुणकर, जेष्ठ शिवसैनिक कोंडू फाळके, उपतालुका प्रमुख नितीन पवार, विभाग प्रमुख मनोज सावंत, विभाग सचिव पंढरीनाथ उतेकर, युवासेना उपतालुका प्रमुख स्वप्नील शिर्के, बोरवाडी उपविभाग प्रमुख काशिनाथ देवघरे, उपविभाग प्रमुख प्रदीप पवार, युवासेने विभाग प्रमुख सचिन मोरे, गणेश पवार, आदर्श शिक्षिका दीपाली पडवळ आदींसह शिवसैनिक व कडापे ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ बंधू, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. गोगावले पुढे म्हणाले कि, आम्ही विकासकामे करतो तेव्हाच आपल्याकडे ५ वर्षातून एकदा आशीर्वाद मागतो. आम्ही कामे केली तरच तुम्ही आम्हाला मते द्या नाहीतर देऊ नका. काहीजण येथे येतात ते लोकांना येडे बनवितात. त्यांचा येथे एकही ग्रामपंचायत सदस्य नाही. आम्ही तसे करणार नाही, आम्ही जे बोलतो ते करून दाखवतो. तुम्ही जे आम्हाला पाच वर्षातून एकदा आशीर्वाद देता त्याची परतफेड करायला आम्ही आलो आहोत. विभागातील बडदेमालचा रस्ता हे चांगले काम आपण केले. येथील वयोवृद्ध महिलांनी त्यावेळी आम्हाला आशीर्वाद दिले. सव्वा कोटी रु. त्या रस्त्याच्या कामासाठी दिले. टिटव्यापासून अगदी वरपर्यंत या रस्त्याचे काम होणार आहे. बोरमाचंला आपण पैसे दिले तेथील कामे आपण करणार आहोत. विभागातील सर्व कामे आपण करणार आहोत. आपण पाण्याची व चावडीची व्यवस्था करतोय. जी विकासकामे करता येतील ती आपण करणार आहोत.

### आमदारांच्या कार्याचे कौतुक

**कडापे ग्रामपंचायतीचे सरपंच मारुती मोकाशी यांनी सांगितले, सांगायला अभिमान वाटतो कार्यसम्राट आ. भरत गोगावले यांच्या माध्यमातून कडापे ग्रामपंचायत हद्दीत दोन ते अडीच कोटी रुपयांची विकासकामे झाल्याने मी त्यांना धन्यवाद देतो. आ. गोगावले यांच्यासारखा भरघोस निधी देणारा आमदार तसेच नेता कधी आपल्याला लाभला नाही.**

# वणव्याच्या आगीने वडाचे झाड जळून पडले रस्त्यावर



## श्रीवर्धन-गोरेगाव मार्गावरील वाहतूक झाली ठप्प

**म्हसळा : प्रतिनिधी**

थंडी संपून उन्हाळा वाढू लागला की, कोकणातला वणव्यांचा प्रश्न प्रतिवर्षी ज्वलंत बनू लागतो. तरुणांनी धरलेला मुंबईचा रस्ता, दिवसेंदिवस पडिक राहणारी जमीन, त्या जमिनीत प्रतिवर्षी वाढणारे गवत आणि ते नष्ट करण्यासाठी नापिक ओसाड जामिनीवर होणारा खर्च कोकणातील लोकाना न परवडणारा ठरत आहे. अशाच मालकी जमिनीतील वणव्याने तब्बल एक तास गोरेगाव-म्हसळा रस्त्यावरील वाहतूक रोखून धरल्याची घटना शनिवारी (दि.११) घडली.

ही घटना गोरेगाव-म्हसळा रस्त्यावर खामगाव नजिक घडल्याचे सांगण्यात आले. या वेळी दोनही बाजूने शेकडोनी वाहने अडकली होती. एस.टी. प्रवासी संघटनेचे अनिल महामुनकर यानी तात्काळ श्रीवर्धन-माणगाव एसटी स्थानक आणि विभाग नियंत्रक पेण, वन विभाग म्हसळा, बांधकाम विभाग महाड- श्रीवर्धन विभागांना दूरध्वनीने घालून मार्ग खुला करून घेतला. खाजगी जामिनीत मोठ्या प्रमाणात वाढणारे गवत नष्ट करण्यासाठी लावले जाणारे वणवे हेच मुख्य कारण असावे, हे अद्यापी एक न सुटणारे दुष्टचक्र बनून सध्या राहिले आहे.

म्हसळा तालुका वनक्षेत्रात सुमारे ५२२१ हेक्टर क्षेत्रांत वनसंपत्ती आहे. फेब्रुवारी ते मार्च १० पर्यंत मालकी (खाजगी) क्षेत्रात एकूण १८ वणवे व फॉरेस्ट क्षेत्रात ९ वणवे लागले आहेत. वन खात्याचे एकूण २५ हेक्टर क्षेत्रात वणवा लागला. खाजगी मालकी क्षेत्रात नेरुळ, म्हसळा, वरवटणे , घुम, पानवे, जांभूळ, कोळे, केल्टे, पानदरे, आंबेत मरयामखार, कुडतुडी, निगडी अशा गावांतून आहे. वणवे लागले आहेत. कोलवट, वरवटणे, घुम, पानवे, जांभूळ, तोराडी, पांगळोली, कुडगाव, मोरवणे इत्यादी गावातील सरकारीवन क्षेत्रात वणवे लागल्याच्या नोंदी आहेत.

गाव-वाडींतील मूळ मालकानी बहुतांश जमीनी मुंबई- पुणे -नाशिक-जळगाव या भागातील लोकाना वारेमाप भावाने विकल्याने जमीन मालकांना रस राहिला नाही, असे दिसून येते.

# मुंबई-गोवा महामार्गावरील गांधारी पुलाची दुरूस्ती

## एकेरी वाहतूक सुरू

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामात मोहोप्रे गावाजवळ गांधारी नदीवर बांधलेला पूल एक वर्षाच्या आतच दुरुस्तीच्या नावाखाली बंद आहे. याठिकाणी एकेरी वाहतूक सुरू असून वर्षाच्या आतच या पुलाची दुरुस्ती करण्याची नामुष्की एल. अँड. टी. कंपनीवर आली आहे. यामुळे महामार्गाच्या गुणवत्तेबाबत असलेला प्रश्न कायम राहिला आहे.



महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्यातील चौपदरीकरण सुरू आहे. या कामात महाड जवळील मोहोप्रे गावाजवळ असलेला जुना पूल तोडून त्या ठिकाणी नवीन पूल बांधण्यात आलेला आहे. या पुलाला रस्ता आणि पूल यामधील असलेला जोड नादुरुस्त झाल्याने गुरुवार ९ मार्चपासून या ठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. एक वर्षाच्या आतच या ठिकाणी दुरुस्ती करण्याची नामुष्की एल. अँड. टी. कंपनीवर आल्याने संपूर्ण महामार्गाच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आलेला आहे. मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. केंद्रीय बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांनी सदर महामार्गाचे काम सन २०२१ अखेर पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिले होते. मंत्री नितीन गडकरी यांनी हे आश्वासन पूर्ण देखील केले असते, मात्र महामार्गाच्या कामात लागणाऱ्या विविध परवानग्या पूर्ण करून देण्यात स्थानिक महसूल आणि महामार्ग प्रशासनाला अपयश आले. यामुळे हा महामार्ग आजही अपूर्णावस्थेत आहे.

मुंबई गोवा महामार्गाचे काम गेली दहा वर्षापासून सुरु आहे. पहिल्या टप्प्यातील काम पूर्णपणे निकृष्ट झाल्याने दुसरा टप्पा आता काँक्रीटच्या माध्यमातून केला जात आहे. तर दुसऱ्या टप्प्यातील काम देखील काँक्रिटचे होत आहे. मात्र महामार्गाच्या कामात अनेक छोट्या मोठ्या चुका असल्या तरी महामार्गाचे काम पूर्ण करुन शासनाकडे सुपूर्द करण्याकडे महामार्ग कामातील ठेकेदार कंपन्यांनी सपाटा लावला आहे. अनेक ठिकाणी नावातील बदल, पुलांची कामे, चुकीच्या पद्धतीने दिलेले बायपास, यामुळे बहुतांश ठिकाणी धोकादायक स्थिती दिसून येते.

महामार्गाच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी करोडो रुपये मोजून नेमलेल्या कंपन्यांचे प्रतिनिधी देखील कार्यालयात ए.सी. मध्ये बसून कामकाज करत आहेत. हीच अवस्था महामार्ग बांधकाम विभागाची असून ते देखील होत असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त करताना दिसत आहेत. महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत वर्षाच्या आत देखभाल केली जाते ही चांगली बाब असल्याचे स्पष्ट केल्याने अधिकारी वर्ग किती गांभीर्याने घेतो हे लक्षात येईल.

# राजेंद्र गाणार 'रायगड श्री'



**अलिबाग :** जय हनुमान व्यायाम शाळा कावाडे बेलपाडा आयोजित रायगड जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत राजेंद्र गाणार रायगड श्री किताबाचा मानकरी ठरला. तालुकास्तरीय स्पर्धेत मकरंद पलंग 'अलिबाग श्री' व श्रेयस म्हात्रेने 'खारेपाट श्री'चे विजेतेपद पटकाविले.

ही स्पर्धा गेली १३ वर्षे सातत्याने भरविण्यात येत आहेत. स्पर्धेत जिल्ह्यातील सुमारे ६०हून अधिक स्पर्धकांचा सहभाग होता, तर स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने प्रेक्षक हजर होते.

# महाडमधील इमारतीलगतची विहीर खचली

## 'तारिक गार्डन'सारख्या दुर्घटनेची भीती; रहिवाशांनी खाली केली घरे

**महाड : प्रतिनिधी**

महाडमधील शिवम अपार्टमेंटच्या डी विंग शेजारी असलेली विहीर सायंकाळी अचानक कोसळली. या विहिरीलगत इमारतीचे कॉलम असल्याने इमारतीला धोका निर्माण झाला आहे. यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण इमारतीमधील रहिवाशांना खाली करण्यात आले आहे. तज्ञ व्यक्तींच्या माध्यमातून या ठिकाणी तपासणी केली जात आहे.

महाडमध्ये तारीक गार्डन दुर्घटनेचा विसर झालेला नसताना सावित्री नदीकिनारी बांधण्यात आलेल्या शिवम अपार्टमेंट च्या डी. विंग शेजारी असलेली विहीर सायंकाळी अचानक खचली विहीर खचल्यामुळे इमारतीचे कॉलम पूर्णपणे उघडे पडले. यामुळे इमारत कोसळण्याच्या भीतीने नागरिकांनी तत्काळ इमारत खाली गेली. सदर घटना नगरपरिषदेला कळताच नगर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी इमारतीचा ताबा घेतला. यामुळे रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आणि तज्ञ व्यक्तींना या ठिकाणी पाचारण केले आहे. सदर घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून नागरिकांनी घाबरून जाण्याचे आव्हान मात्र नगरपालिकेने केले आहे. महाडमधील तारीक गार्डन ही इमारत अशाच पद्धतीने पत्त्याप्रमाणे कोसळली होती. यामध्ये जीवित हानी झालेली होती या घटनेचा विसर पडलेला नसताना आज अचानक कोसळलेल्या विहिरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. इमारत परवाने देताना सुरक्षेच्या बाबतीत पालिकेच्या बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे देखील यातून समोर आले आहे.



### चुकीच्या पद्धतीने बांधला कठडा

**शिवम अपार्टमेंटच्या शेजारी असलेली विहीर इमारत बांधकाम केल्यापासून खोदण्यात आलेले आहे सदर विहिरीवर नुकताच कठड्याचे बांधकाम केले गेले आहे हे कठड्याचे काम करताना इतर विंग मधील रहिवाशांनी विरोध दर्शवला होता मात्र तरी देखील हे काम केले गेल्यामुळेच ही स्थिती निर्माण झाल्याचे येथील रहिवाशांनी सांगितले. विहिरीच्या कठड्यालगतच इमारतीचे कॉलम कसे उभे राहिले हा देखील प्रश्न यातून उपस्थित झाला आहे.**

# संभाजीराजेंबद्दलचा खरा इतिहास समोर आणला पाहिजे -कोळंबे

**कर्जत : प्रतिनिधी**

'छत्रपती संभाजी महाराज फंद फितुरीमुळे औरंगजेबाच्या ताब्यात मिळाले. तर हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांचासुद्धा फंद फितुरीमुळे इंग्रजांच्या हातून बळी गेला. अशी असंख्य उदाहरणे आहेत. फितुरी ही आपल्या देशाला लागलेली जुनी कीड आहे. संभाजी महाराज निधड्या छातीने युद्धासाठी उतरत. त्यांच्या ऐवजी छत्रपती शिवाजी महाराज त्याजागी असते तर ते गनिमी काव्याने तेथून बचावले असते. काही लेखकांनी संभाजी महाराजांबद्दलचा इतिहास वेगळा लिहिल्याने आपल्याला तो इतिहास माहिती आहे. मात्र त्यांच्या बद्दलचा इतिहास फार वेगळा आहे. तो आपण समाजासमोर आणला पाहिजे.' असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे यांनी केले.



मराठा सेवा संघ कर्जत व संभाजी बिग्रेड कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने कोंकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या एका समारंभाचे आयोजन केले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश ठाकरे, माजी सरपंच मधुकर घारे, सुदाम पवाळी, समीर सानप, जिजाऊ फाउंडेशनच्या अध्यक्ष पूजा सुर्वे, व्याख्यात्या सायली भोसले, प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान, अनिल भोसले आदी उपस्थित होते.

मधुकर घारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अनिल भोसले यांनी प्रास्ताविक केले. सायली भोसले यांनी मार्गदर्शन करताना, 'छत्रपती संभाजी महाराज उपेक्षित राहिले. त्यांचा खरा इतिहास अनेकांना माहीत नाही. तो सर्वांना माहिती होण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात जगदीश ठाकरे यांनी, 'छत्रपती शिवाजी महाराजांमुळे आपण येथे आहोत. देशातील अनेक राजे केवळ सेनापतींच्या बरोबर सैन्य घेऊन युद्धाला सामोरे गेले मात्र छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज स्वतः निधड्या छातीने युद्धामध्ये उतरून युद्ध जिंकत असत. शंभूराजांना मरणाची भीती कधीच वाटली नाही. त्यांचा इतिहास समजावा म्हणून केवळ जयंती, पुण्यतिथीच्या दिवशी व्याख्याने आयोजित करून उपयोग नाही. प्रत्येक महिन्याला शाळा, महाविद्यालयात ती आयोजित करणे आवश्यक आहे तरच छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास युवा पिढीला कळेल.' असे स्पष्ट केले. सूत्रसंचालन विजय कोंडीलकर आणि श्रीकांत आगीवले यांनी केले तर आभार रोहिदास लोभी यांनी मानले. याप्रसंगी राजकुमार नारखेडे, प्रकाश पालकर, संतोष ऐनकर, अनिकेत भोईर, ज्ञानेश्वर भालिवडे, रामदास घरत, भगवान धुळे, समीर शिंदे, दीपक भालेराव, गजानन लाड, विलास सांगळे, रत्नाकर बडेकर, माधव कोळंबे, दत्ताराम जगताप, दशरथ मुने ऋषभ लाड आदी उपस्थित होते.

# चिंचबा देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**मुरुड : प्रतिनिधी**

बोर्ली पंचतन येथील होळीचे पटांगण येथे चिंचबा देवीचे मोठे मंदीर असून येथे दरवर्षी होळी संपल्यावर किमान सात दिवस या देवीचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रातून विविध भागातून लोक दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी करीत असतात. या सात दिवसात देवीचे विविध कार्यक्रम होत असतात. बोर्ली पंचतन येथे ऐक गाव एक होळी अशी परंपरा गेल्या अनेक वरशापासून सुरू आहे. होळी दहन झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता देवीच्या मूळ मंदिरातून पालखी मिरवणूक निघते. त्या पालखी बरोबरच पारंपरिक पद्धतीने सुरू असलेला राधेचा खेळ व नंतर राधेची पूजा केली जाते. देवीची पालखी ज्या वेळी गावातून फिरते त्यावेळी असंख्य महिला उपवास करतात. पालखीच्या मार्गावर संपूर्ण रस्ता दुधाने शिंपडला जातो. देवीची पालखी संपूर्ण दिवस गावामधून फिरवली जाते त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी आठ ते नऊ चे सुमारास होळीच्या मंदिरात विराजमान होते. सात दिवसात होळीच्या नाट्य गृहामध्ये विविध प्रकारचे म्हणजेच नाटक ग्रूप डान्स व विविध करमणूक कार्यक्रम होत असतात.



शेवटच्या रात्री येथे अखंड आगरी समाज बोर्ली पंचतन यांचा देवीचा मूळ कार्यक्रम होत असतो. या कार्यक्रमात देवीची विविध रूपे साकारली जातात. सात दिवसानंतर होळीच्या मंदीरामधून पालखी मिरवणूक काढली जाते व गावातील चौका चौकात पूजा अर्चा केली जाते. बोर्लीमधील रहिवाशी व पंचक्रोशीमधील देवी भक्त या दिवशी 'बालय गो दिंगलाय' या घोष वाक्याने गुलाल उधळून देवीचा जल्लोष करीत असतात.

### नवसाला पावणारी देवी

*याबाबत अधिक माहिती सांगताना चींचबा देवी देवस्थान ट्रस्टचे अधक्ष सुजित पाटील व खजिनदार शंकर गाणेकर यांनी सांगितले की देवीचे स्थान हे स्वयंभू असून नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध आहे. सात दिवसाच्या या महोत्सवात सर्वात जास्त महिला दर्शनासाठी येत असतात. सुमारे २५ हजाराच्यावर भाविक सात दिवसात दर्शनाला येत असतात. जे भक्त देवीचे दर्शन घेऊन जातात त्यांच्या मनातील सर्व इच्छा पूर्ण करून दरवर्षी भाविकांची संख्या येथे वृध्दींगत होत असते.*

# जगातील सर्वांत लहान श्रींची साकारली रांगोळी; तरुणाचा गौरव

**मुरुड : प्रतिनिधी**

अनिरुद्ध खेडेकर हे तरुण रांगोळीकार असून त्यांच्या विविध रांगोळ्या खूप प्रसिद्ध झाल्या आहेत. कमी वेळेत अचूक रांगोळी काढून त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

मुरुड तालुक्यातील नांदगावचे सुपुत्र खेडेकर यांनी साकारलेली रांगोळी महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री अष्टविनायकांमधील श्री क्षेत्र बल्लाळेश्वर, पाली, जि. रायगड येथील श्रींच्या मूर्तीची प्रतिकृतीची असून सध्या चलनात असलेल्या १ रुपया नाण्याच्या आकारात ही रांगोळी साकारण्यात आली आहे.

निव्वळ २.८ ग्रॅम रांगोळीचा वापर करून आंग्लवर्षीय गणनेनुसार १० मिनिटांहून किंचित कमी कालावधीत ही पोर्ट्रेट रांगोळी साकारण्याची विश्वविक्रमी नोंद हार्वर्ड वर्ल्ड रेकॉर्ड, लंडनमार्फत करण्यात करण्यात आली आहे. त्याबद्दल भंडारी मित्र मंडळ यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. त्यावेळी उपस्थित शैलेश खोत, विजय साखरकर, दिनेश खेडेकर, जितेंद्र सुर्वे, भालचंद्र घुमकर, राजन पुलेकर, पराग खेडेकर, प्रतीक पेडणेकर, दिनेश पेडणेकर, स्वप्निल कांबळे, किरण खेडेकर, दीपेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनिरुद्ध खेडेकर यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले.



# आगरदांडा येथे विविध उपक्रमांना प्रतिसाद



**मुरुड : प्रतिनिधी**

अदानी फाऊंडेशन माध्यमातून ग्रामपंचायत आगरदांडा येथे जागतिक महिला सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून तसेच दीपप्रज्वलन करुन करण्यात आली.

कार्यक्रमाला ग्राम पंचायत सरपंच ऋषाली डोंगरीकर, उपसरपंच बाबासाहेब अर्झबेगी, ग्राम पंचायत सदस्य, समाज अध्यक्ष, होवे प्रोजेक्ट, दिघी पोर्ट लिमिटेडचे सत्येंद्र यादव, नितीन चांदोरकर, अदानी फाउंडेशन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे उपस्थित होत्या.

प्रस्तावनेत जयश्री काळे यांनी महिला सक्षमीकरण हि काळाची गरज आहे. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत असताना महिलांची यशोगाथा प्रशंसनीय आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी महिलांची मुख्य भूमिका आहेत. नितीन चांदोरकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. उपसरपंच बाबासाहेब अर्जबेगी यांनी अदानी फाउंडेशन माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या स्तुत्य उपक्रमांची प्रशंसा केली. सर्व महिलांची हिमोग्लोबिन तपासणी आणि सीबीसी चाचणी अदानी फाउंडेशनच्या माध्यमातून मोफत करण्यात आली. पटेल पथोलॉजी प्रयोगशाळा मुरुडचे सुनील पटेल यांनी सहकार्य केले.

सर्व महिलांसाठी विवीध खेळ जसे रस्सीखेच, गोटी चमचा, संगीत खुर्ची अशा खेळामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरण्यात आले. बक्षिसांचा वर्षाव बघता महिलांमध्ये भरपूर आनंदाचे वातावरण दिसून आले. अवधूत पाटील यांनी महिलांना प्रत्येक खेळामध्ये सहभाग करून घेतला. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी प्राजक्ता अडुळकर, दामिनी घागरी, अर्चना कासारे ग्राम सखी, अदानी फाउंडेशन चे अवधूत पाटील यांनी अथक परिश्रम घेतले.

पनवेल महापालिकेची स्थापना झाल्यापासून पनवेलच्या सर्व क्षेत्रांतील मालमत्तांना करप्रणाली लागू करण्यात आली आहे. **हे कायद्याने बंधनकारक आहे.** वर्षाला यामुळे दीडशे कोटी रुपये पालिकेच्या तिजोरीत जमा होणार असून याचा लाभ नागरिकांसाठी सोयीसुविधा उभारण्यासाठी पालिका करणार आहे.

पनवेल महापालिकेची स्थापना १ ओक्टोंबर २०१६ रोजी झाली. त्यामध्ये पूर्वाश्रमीचे नगरपरिषदेचे क्षेत्र तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या २३ ग्रामपंचायती (२९ महसुली गावे) व सिडको अंतर्गत क्षेत्राचा समावेश करण्यात आला. नव्याने समाविष्ट क्षेत्रातील मालमत्तांचे जीआयएस प्रणालीने सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामध्ये नव्याने अंदाजे २ लाख ४६ हजार १८५ इतक्या मालमत्ता आढळून आल्या आहेत. तसेच पूर्वाश्रमीच्या नगरपरिषद हद्दीतील ४३ हजार ९१९ व पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायत हद्दीतील ३० हजार ३१९ अशा एकूण ३ लाख २० हजार ८२३ मालमत्ताना कर आकारणी करण्यात येणार आहे. सादर वाजवी वार्षिक भाडे मूल्य दर कमाल रुपये ६२४/- व किमान रुपये ३४३/- प्रती चौ. मीटर प्रती वर्षी निश्चित करण्यात आले. त्यानुसार काही मालमत्तांची कर आकारणी करण्यात आली आहे. त्यानंतर महापालिका हद्दीतील मालमत्ताना कर आकारणी करणे करिता करांचे दर निश्चित करणे करिता मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रातील महानगरपालिकांच्या कर दराचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीने महानगर पालिका क्षेत्राचे ८ विभाग (नोड) व ४ उपविभाग (झोन) मध्ये विभागणी करून वार्षिक भाडे मूल्य निश्चित केले. जीआयएस




प्रणालीद्वारे सर्वेक्षण पूर्ण झालेल्या मालमत्ताना विशेष नोटीसा देऊन २१ दिवसात हरकती मागवण्यात अल्या होत्या. पनवेल महानगरपालिकेची स्थापना २०१६ साली झाल्यापासून पूर्वाश्रमीच्या नगरपरिषद- ग्रामपंचायत हद्दीतील ७० हजार मालमत्ता धारकांनी भरलेल्या करावरती नवीन महानगरपालिकेचा डोलारा उभारला आहे. जी.आय.एस.सर्वेक्षणानूसार महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या सिडको नोडमधील २ लाख ५० हजार मालमत्ता धारकांना यापूर्वी १६ नोव्हेंबर २०१९ ला आदेश पारित करून नोड व झोन नुसार मालमत्ता दर निश्चित केले होते. या दरावर अनेक नागरिकांनी तसेच नगरसेवकांनी हरकत घेतल्यामुळे या आदेशामध्ये बदल करून १२ मे २०२१ च्या आदेशानुसार वार्षिक भाडे मूल्यांमध्ये सर्वसाधारणपणे ३० टक्के दर कमी करण्यात आले. नागरिकांना चांगल्या प्रकारे नागरी सुविधा मिळाव्यात या करिता महापालिकेची स्थापना झाल्यानंतर अनेक विकास कामे करण्यास सुरुवात केली आहे. त्या मध्ये प्रामुख्याने प्रशासनाने पालिका क्षेत्राचे स्मार्ट सिटीत रूपांतर व्हावे या करता पाऊले उचलली आहेत. रस्ते कुठे आणि कसे असावेत, ड्रेनेज वॉटरची व्यवस्था, इमारतींचे योग्य नियोजन आणि खेळाची मैदाने. पाण्याच्या नियोजना करता नागरिकांची असलेली पाण्याची गरज ओळखून नव्याने पाईप लाईन टाकणे, नवीन जलकुंभाची जागा निश्चित करणे, नव्याने आवश्यकता असलेल्या ठिकाणी वॉटर पंपाची जागा सुचवणे त्याच प्रमाणे वाढत्या लोकसंख्येचा विचार करता पुढील ५० वर्षाचे नियोजन करून पाण्याचे नवीन स्त्रोत निर्माण करून नवीन धरणासाठी जागा सुचवणे. त्याच बरोबर नागरिकांच्या आरोग्य संदर्भात कचरा वर्गीकरण करण्याचे नवीन टेक्निक सुचवणे, नवीन शौचालयाच्या जागा निश्चित, करुन स्वच्छ भारत स्वच्छ महाराष्ट्राच्या संबंधी विविध कामे. पालिका क्षेत्रात सुंदर व आकर्षित दिसावे या करिता शोभेच्या बेटांची जागा, नवीन सुंदर बगीचे त्याच प्रमाणे शहरातील डेव्हलपमेंट विषयी आराखडा बनवणे. सध्या महापालिकेचे एकच अग्निशमन केंद्र असल्याने गावठाण परिसरात अजून दोन ठिकाणी नव्या अग्निशमन केंद्रा करिता जागा निश्चिती करणे. नियोजनबद्ध शहर असण्याकरिता गावठाणा बरोबरच संपूर्ण पालिका क्षेत्राचा आता खऱ्या अर्थाने विकास होणार असून पालिकेच्या तिजोरीत महसुलाची भर पडणार आहे.

स्थानिक नगरपालिका संस्था काही महत्त्वाच्या सेवा पुरवतात, जसे की परिसरात स्वच्छता ठेवणे, पाणी पुरवठा, स्थानिक रस्त्यांची देखभाल, ड्रेनेज आणि इतर नागरी सुविधा. मालमत्ता कर महानगरपालिका संस्थांना ती प्रदान केलेल्या सर्व सेवांसाठी महसूल मिळवून देतो. महापालिका संस्थांच्या उत्पन्नाचे हे प्रमुख स्त्रोत आहे. जर तुम्ही मालमत्ता कर भरला नाही तर, नगरपालिका संस्था पाणी कनेक्शन किंवा इतर सेवा देण्यास नकार देऊ शकते आणि ती देय रक्कम वसूल करण्यासाठी कायदेशीर कारवाई देखील करू शकते.


छत्रपति शिवाजी महाराज स्मारकाचे सुशोभिकरण

## अमृत योजनेंतर्गत ५०.६६ कोटी रुपयांची कामे पर्ण

पनवेल शहरातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यास आयुक्तांनी प्राधन्यक्रम देऊन अमृत योजने अंतर्गत झालेल्या कामातून २० द.ल.लि पाणी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर २८८ द.ल.लि क्षमतेचे न्हावाशेवा पाणीपुरवठा योजना मे २०२४ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या योजनेतुन पनवेल महानगरपालिकेला एकूण १०० द.ल.लि पाणी दररोज मिळणार आहे.पनवेल पालिकेच्या माध्यमातून अनेक विकास कामे मोठ्या प्रमाणात सुरु करण्यात आली आहेत . पनवेलकरांची तहान भागविण्याकरीता २०४५ सालचा विचार करून नियोजन करण्यात आले आहे. याकरीता पाच वेगवेगळया ठिकाणी जलकुंभ बांधण्यात आले आहेत. पनवेल शहरातील पाच जलकुंभाच्या माध्यमातून पाणी प्रश्न निकाली निघणार असून पालिका क्षेत्रातील ग्रामीण भागात सुद्धा ४१ जलकुंभ बांधण्यात येणार असून याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात आले आहे .


महापालिका प्रभाग कार्यालये

## पंतप्रधान आवास योजनामधून पहिल्या टप्प्यात पनवेलमहापालिका बांधणार २४०० घरे

व्हीआरपी सर्वेनुसार २६ झोपडपट्ट्यांचे झालेले सर्वेक्षण, सर्वेक्षण झालेल्या २६ झोपडपट्ट्यांपैकी शक्य असलेल्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणे, तसेच शासनाच्या विविध समाज उपयोगी कल्याणकारी योजना महापालिका क्षेत्रात राबविण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला असून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात झोपडपट्टी धारकाणासाठी २४०० घरे बांधून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून वाल्मिकीनगर , महाकालीनगर,लक्ष्मी वसाहत ,कच्छी मोहल्ला आणि पटेल मोहल्ला अश्या पाच ठिकाणी खऱ्या अर्थाने पनवेल शहराची झोपडपट्टी मुक्तीच्या दिशेने वाटचाल सुरु असून युद्ध पातळीवर प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा सुरु असून लवकरच सर्व प्रकारच्या शासकीय मंजुरी मिळाल्या नंतर पनवेल शहर झोपडपट्टी मुक्त बघायला मिळणार आहेत.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे सुशोभिकरण

## महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण

अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण झाले आहेत त्यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढविणे तसेच सदर परिसराचे सुशोभिकरण आणि छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभिकणाचे काम यांचा समावेश असून ते पूर्ण करून पनवेलच्या वैभवामध्ये भर घालण्यात आली आहे. कन्या शाळा, समाज मंदिरे, वडाळे तलाव सुशोभिकरण, स्मार्ट व्हिलेज अंतर्गत कोयनावळे,करवले,धानसर, रोडपाली, बौध्दवाडा येथील पायाभूत सुविधांची कामे जलदगतीने पूर्ण होत आहेत. प्रस्तावित कामांमध्ये नवीन मुख्यालय बांधणे, एलईडी पथदिवे बसविणे, विद्युत वाहिन्या भूमिगत करणे तसेच वडाळे, जुई, तळोजे, पाचनंद येथील तलावांचे सुशोभिकरण करण्यात येत आहे. तसेच हद्दीतील सहा मोठया कॉंक्रीट रस्त्यांचे (४४३३ चौ. मी.) काम अंतिम टप्प्यात आहे.या व्यतिरिक्त खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज मैदान विकसित करणे, नवीन पनवेल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र विकसित करणे यांचा समावेश आहे. पनवेल महापालिका हद्दीतील नागरिकांना सामाजिक सोयीसुविधा मिळाव्या या हेतूने सिडकोकडून भूखंड हस्तांतरणासाठी वारंवार पाठपुरावा सुरु केला आहे. यास यश मिळाले असून या भूखंडाचा उपयोग मैदाने, प्रशासकीय इमारती, उद्याने, डेली बाजार, स्मशानभूमी व दफनभूमी आदींसाठी केला जाणार आहे.


ग्रामीण भागातील रस्त्यांचे डांबरीकरण



मच्छिमार्केट इमारत नावडे

भारताचे संविधान नऊ – क – नगरपालिका अनुछेद 243 भ अन्वये मालमत्ता कर आकारणी करणे, वसूल व विनीयोजन करणेकामी तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 127, 128, 129, 150 अ अंतर्गत मालमत्ता कराची आकारणी करणेत येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्टे चार कलम 493 संक्रमण कालीन तरतूदी 5 (ब) अन्वये मालमत्ता कर आकारणी करण्यात येत आहे.


महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 3 अन्वये महापालिका स्थापनेपासून करआकारणी करणेत आली आहे व कलम 150 अ तसेच अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 15(2) अनव्ये पूर्वलक्षी प्रभावाने मागील 6 वर्षे पर्यंत मालमत्ता कर आकारणी करणेत आलेली आहे.} {महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 99 व 128 अ अन्वये स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 15-01-2019 अन्वये मालमत्ता कर व दरास मंजूरी देण्यात आली. सदर मंजूरी सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 118 दिनांक 17-01-2019 अन्वये मालमत्ता कर व करांचे दिनांक 01-10 -2016 पासून मान्यता देण्यात आलेली आहे.}

मालमत्ता
कराची रक्कम रोख/चेक/
डी डी/ ऑनलाईन स्वरूपात
स्वीकारली जाते. ४. ऑनलाईन पेमेंट
**www.panvelmc.org** या संकेत
स्थळावरमालमत्ता कराचा भरणा
ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.
**PMC TAX APP** वर सुविधा उपलब्ध
आहे. तसेच Onlineभरल्यास
2% सूट.


थकीत
मागणी वर 01 एप्रिल पासून
प्रती माह 2% शास्ती / दंड लागतो,
बिल दिल्यापासून संपल्यानंतर
90 दिवसाच्या आत भरणा न केल्यास
अर्धवार्षिक वर दरमहा 2% शास्ती
महा शिक्षण कर,रोजगार हमी कर, मोठी
इमारत कर, घन कचरा कर
सोडून इतर म.न.पा
करावर लागते.




महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी व इमारतींना मालमत्ता कर ऐच्छिक नसून, अनिवार्य आहे.



पनवेल महापालिका मुख्यालयाची इमारत



वडाळे तलाव सुशोभिकरण

आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो अशी विविध विकासकामे पनवेल शहराच्या कार्यक्षेत्रात होत आहेत. या सर्वांचा विचार करुन भविष्यकाळाच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेनेही पायाभूत विकासकामे करण्यास सुरुवात केली आहे. मालमत्ता कर हा पालिकेचा एकमेव आर्थिक स्त्रोत आहे. नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरुन महापालिकेच्या विकासकामांमध्ये हातभार लावावा.
–राजेश जयराम केणी

पनवेल हे राहण्यासाठी सर्वोत्तम शहर करण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे. शहरातील तलावांच्या सुशोभीकरणाबरोबरच पायाभूत सोयी सुविधा देण्यासाठी पालिकेने कंबर कसली आहे. सर्व सोयींनी युक्त शहर तयार करण्याच्या दिशेने पालिकेचा प्रवास सुरु झाला आहे. आता विकासाची झेप घेण्यास पनवेल तयार आहे. या प्रगतीत मी मालमत्ता कर भरून सहभागी झालो. तुम्हीही या विकासाचे सारथी व्हा...
–सुजीत आण्णा राजे

एमएमआर रिजनमध्ये सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरांमध्ये पनवेल शहराचा समावेश होतो आहे. शहराच्या विकासात करदाता म्हणून सहभागी होण्याचे कर्तव्य सर्वांनी निभावले पाहिजे. मी माझा मालमत्ता कर भरला. तुम्हीही तुमचा मालमत्ता कर भरुन या विकास यात्रेत सहभागी व्हा व पनवेल शहराच्या पायाभूत सुविधेसाठी सर्वांनी कर भरून हातभार लावावा.
–रमेश तापसे

काही राजकीयांच्या आणि संघटनांच्या भूलथापांना भुलून मी माझा मालमत्ता कर भरला नाही. त्या वेळी महापालिकेने दिलेली १७ टक्क्यांची सुट मी घेतली असती तर माझा आर्थिक फायदा झाला असता, परंतु शास्ती लागण्याच्या आधी मी माझा मालमत्ता कर भरला. पालिकेच्या सोयी सुविधा हव्या असतील तर नागरिकांनी मालमत्ता कर भरुन पालिकेला सहकार्य करणे गरजेचे आहे.
–चंद्रकांत कदम

(ADVT)